नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष २८ * अंक ३५५ * | * वर्धा * | शुक्रवार, दिनांक २० जून २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## कोरोनामुळे यावर्षी देशात ११६ मृत्यू

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १९ :**
देशात कोरोनाव्हायरसच्या सक्रिय रुग्णांची संख्या ५९७६ वर आली आहे. गेल्या २४ तासांत ५०७ रुग्ण बरे झाले आहेत. त्याच वेळी, ४० नवीन रुग्णांची नोंद झाली आहे.
आरोग्य विभागाच्या माहितीनुसार, जानेवारी २०२५ पासून नवीन प्रकारामुळे ११६ मृत्यू झाले आहेत. दिल्लीत २ आणि केरळमध्ये १ मृत्यू झाला आहे. केरळमध्ये सर्वाधिक १३०९ सक्रिय रुग्ण आहेत. केरळमध्ये सर्वाधिक ३७ जणांचा मृत्यू झाला आहे. गुजरातमध्ये १०४६ आणि पश्चिम बंगालमध्ये ७४७ रुग्ण आढळले आहेत. नवीन प्रकार देशातील ३२ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये पसरला आहे.

अग्रलेख

## खरीखरी..

## वनविद्यावाचस्पती गेले दिगंतरा

वनाच्या मनात ज्यांचे स्थान होते, त्या मारुती चित्तमपल्ली यांची जीवनयात्रा संपली. शिक्षण घेतल्यानंतर आयुष्यभर ज्यांनी वन आणि पर्यावरण यांची अत्यंत तळमळीने शुश्रुषा केली, सेवा केली. ते वनविद्या वाचस्पती मारुती चितमपल्ली यांनी काल इच्छामरण पत्करले. या वनवाचस्पतीचे मृत्यूपूर्वीचे शेवटचे शब्द कोणते असावेत, 'माझ्या सर्व इच्छा पूर्ण झालेल्या आहेत, आता मला जाण्याची परवानगी द्या'. त्यांचे सख्खे पुतणे श्रीनिवास चितमपल्ली यांना हे शब्द आघातासारखे वाटले. मारुती चितमपल्ली यांचे संपूर्ण जीवन जवळजवळ विदर्भातच गेले. सरकारी नोकरीच्या निमित्ताने ते विदर्भात आले आणि विदर्भाच्या वनांचे दत्तक पुत्र झाले. येथील जंगलांशी त्यांनी घट्ट नाते जुळवलेले होते. त्यांच्या कुटुंबात त्यांची पत्नी आणि त्यांची एक पुत्री एवढेच आत्मीयजन होते. त्यांच्या पत्नीचे अकाली निधन झाले आणि पित्याची सेवा करण्यासाठी पुत्रीने लग्नच केले नाही. दुर्दैव असे की त्यांना जपणारी त्यांची लेकही अल्पशा आजाराने अकाली निधन पावली. मुलगी असेपर्यंत त्यांनी नागपुरातच वास्तव्य केलेले होते. या शहरात राहूनच त्यांनी पर्यावरण आणि वने यांच्यावर २५ पुस्तकांचे लेखन केले. त्यांनी पक्षीकोश लिहिला. वन्य प्राणीकोश याचेही काम पूर्ण झालेले आहे. मत्स्यकोशाचे काम ते करीत होते. वृक्षकोशाची संहिता पूर्ण झाल्याचे त्यांनी सांगितले होते. म्हणजे हा वनयोगी केवळ वनाचे चिंतन करीत नव्हता. तर आपले प्रत्येक पुस्तक अभ्यासपूर्ण आणि सर्वांग दृष्टीने परिपूर्ण राहील, याकडेही ते बारीक लक्ष देत असायचे. त्यांनी जे साहित्य निर्माण केले आहे. ते पाहिल्यावर भविष्यात मारुती चितमपल्ली नावाचा एक लेखक होता की अनेक लेखक होते. असा प्रश्न उपस्थित होऊ शकतो. त्यांनी ज्या खात्याला आयुष्यभर सेवा दिली. त्या वनविभागाने त्यांना पद्मश्री देताना ज्या आवश्यक बाबी असतात, त्याची परिपूर्ती केली नाही, ही मोठी खेदाची बाब आहे. राष्ट्रपतींच्या हस्ते त्यांना पद्मश्री मिळाली. तेव्हाच त्यांची तब्येत ठीक नव्हती. वनाची ३६ वर्ष सेवा केल्यानंतरही ते २९ वर्ष जंगलातच राहिले. आपले पुतणे श्रीकांत यांनी त्यांना दिल्लीला नेले. तेव्हाही त्यांची प्रकृती तोळामासाच होती. शेवटी सोलापूरला परत आल्यावर त्यांची तब्येत जास्त खालावली. शेवटपर्यंत वाचन आणि लेखनात दंग असलेल्या या अरण्यऋषीने आपल्या पुतण्याला आपली इहलोकीची यात्रा संपविण्यापूर्वी जाण्याची परवानगी मागितली आणि ते निघून गेले. त्यांना राज्य शासनासह विविध संस्थांनी अनेक महनीय पुरस्कार दिले. भारती विद्यापीठाचा जीवनसाधना पुरस्कार, नागपूरचा अतिशय महत्त्वाचा नागभूषण पुरस्कार, खासदार एन. डी. पाटील समाजसेवक पुरस्कार, रानवाटा या पुस्तकाला उत्कृष्ट साहित्य निर्मिती पुरस्कार, भैरू रतन दमानी साहित्य पुरस्कार, विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार यासह इतर अनेक पुरस्कारांनी मारुती चितमपल्ली यांना नव्हे. तर स्वतःच्या पुरस्कारांनाच अनेकांनी गौरवान्वित केले. सर्व पुरस्कारांची जंत्री द्यायची झाली. तर जागाच पुरणार नाही. त्यांनी केलेली कोश वांङ्मयाची निर्मिती हे त्यांनी मराठी भाषेला दिलेले शब्दांचे धन आहे. त्यांनी निरनिराळ्या श्वापदांना, पाखरांना, वेगवेगळ्या प्राण्यांना दिलेली मराठी नावे आणि वैविध्यपूर्ण प्राणीसृष्टी त्यांच्या लेखनात पानोपानी जाणवते. वन्यजीव आदिवासींची संस्कृती आणि त्यांचे नैसर्गिक जीवन, आदिवासींची मालकी असलेली सृष्टीची रहस्यं अशा प्रकारच्या ललित लेखनातून वाचकांना त्यांनी संमोहित करून टाकलेले होते. हे वनज्ञान ऋषी ज्या ज्या भागात गेले. त्या त्या भागातील आदिवासींच्या भाषा ते मनोमन शिकले. हे त्यांचे बहुभाषाविध ज्ञानोपासक लेखन त्यांच्या विद्वत्तेची साक्ष देते. वनखात्यात सेवा देताना त्यांनी मराठी भाषेच्या वृद्धीसाठी अहर्निश लेखन केले. वनखात्यात नोकरी म्हणजे श्रीमंतीचा राजमार्ग असे म्हटले जाते. मात्र या अरण्य ऋषींनी मराठी भाषेची श्रीमंती वाढवली. गोनिदां म्हणजेच गो. नि. दांडेकर मोठे वनप्रेमी साहित्यिक होते. दांडेकरांनी त्यांना प्रेरणा दिली. विद्वत्तरत्न नरहर कुरुंदकर, पक्षीमित्र डॉक्टर सलीम, सत्यकथाकार राम पटवर्धन यांच्यासह शीर्षस्थ कथाकार जीए म्हणजेच जी. ए. कुलकर्णी वगैरे अनेकांनी त्यांना प्रोत्साहित केले. वनप्रेमी असलेले नवेगाव बांध येथील माधवराव पाटील- डोंगरवार हे त्यांचे अत्यंत जिवलग स्नेही होते. माधवरावांच्या वाड्यात चितमपल्ली वारंवार कुटुंबासह येत असत. येथेच त्यांनी पक्षीकोश निर्माण केला होता. त्यांच्या आयुष्यात त्यांनी अनेक आदिवासी तरुणांशी घट्ट मैत्री केली होती. नवेगाव बांध येथेच त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. गोंदिया जिल्ह्यातील हा भाग विविध पक्षांच्या किलबिलाटाने नेहमीच गजबजलेला असायचा. दररोज शिकार करणाऱ्या आदिवासींनी त्यांच्या संगतीत आल्यावर आपल्याकडील ३६ बंदुका मारुती चितमपल्ली यांच्याकडे सोपवल्या. यावरून त्यांच्या आणि आदिवासींच्या परस्पर संबंधाची कल्पना सहज येऊ शकते. वनाशी संबंधित या विद्यावाचस्पती बद्दल सर्वांनाच आत्मीयता होती. अशा प्रकारे मराठी भाषा समृद्ध करणाऱ्या महान लेखकाला केवळ एकटेपण आल्यामुळे नागपूर सोडावे लागले. ही जिव्हारी लागणारी बाब आहे. पाच वर्षांपूर्वी त्यांनी आपले जन्मगाव सोलापूर येथे प्रयाण केले आणि काल अत्यंत समाधानी जीवन जगलेले मारुती चितमपल्ली पंचत्वात विलीन झाले. त्यांच्या व्यासंगी साहित्याला आणि मराठी भाषेची शब्दसंपदा समृद्ध करणाऱ्या या वनविद्या वाचस्पतीला आमची साश्रू नयनांनी शोकांजली!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

नागपूरच्या १९ वर्षीय दिव्या देशमुखची

# वर्ल्ड नंबर १ वर मात

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १९ :**
नागपूर येथील १९ वर्षीय दिव्या देशमुखने जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकाची बुद्धिबळपटू हौ यिफानचा पराभव केला.




ज्युनियर गटात जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकाच्या दिव्याने चीनच्या हौ यिफानचा पराभव केला आणि जागतिक टीम रॅपिड आणि ब्लिट्झ बुद्धिबळ स्पर्धेत ३ पदके जिंकली. यामध्ये रॅपिड बुद्धिबळात रौप्य आणि ब्लिट्झमध्ये कांस्यपदकांचा समावेश आहे.

लंडनमध्ये पार पडलेल्या एफआयडीई वर्ल्ड ब्लिट्झ टीम बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेच्या उपांत्य फेरीच्या दुसऱ्या टप्प्यात नागपूरच्या दिव्याचा सामना यिफानशी झाला. हा सामना बुद्धिबळाच्या सर्वात वेगवान स्वरूपात होता, यिफानने डब्ल्यूआर बुद्धिबळ संघाचे प्रतिनिधित्व केले, तर दिव्या हेक्सामाइंड बुद्धिबळ क्लबकडून खेळली.
यिफानने पहिल्या टप्प्यात दिव्याचा पराभव केला. पण दुसऱ्या टप्प्यात दिव्याने शानदार पुनरागमन केले. पांढऱ्या सोंगट्यांसह खेळताना, दिव्याने सुरुवातीच्या आघाडीचा फायदा घेतला आणि जलद चाली करून वेळेत नियंत्रण मिळवले.

१९ वर्षीय दिव्याने ब्लिट्झमध्ये कांस्य आणि रॅपिडमध्ये रौप्यपदक जिंकले. वैयक्तिक गटात तिला रॅपिडमध्ये रौप्य आणि ब्लिट्झमध्ये कांस्यपदक मिळाले. हा दिव्याचा हौ यिफानविरुद्धचा पहिला विजय होता. १५ जून रोजी लंडनमधील नोवोटेल वेस्ट येथे झालेल्या या सामन्यात दिव्याच्या कामगिरीचे कौतुक केले जात आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिव्याचे कौतुक करीत सोशल प्लॅटफॉर्मवर लिहिले आहे की, 'लंडनमधील वर्ल्ड टीम ब्लिट्झ चॅम्पियनशिपच्या दुसऱ्या टप्प्यातील ब्लिट्झ सेमीफायनलमध्ये जगातील नंबर १ खेळाडू हौ यिफानला हरवल्याबद्दल दिव्या देशमुखचे अभिनंदन. तिचे यश तिच्या संयम आणि दृढनिश्चयाचे प्रतिबिंब आहे. हे अनेक उदयोन्मुख बुद्धिबळ खेळाडूंना देखील प्रेरणा देते. तिच्या भविष्यातील प्रयत्नांसाठी शुभेच्छा.'

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिव्याचे यश नवीन बुद्धिबळपटूंना प्रेरणादायी असल्याचे म्हणत तिचे अभिनंदन केले आहे. अनेक मान्यवरांनीही तिचे कौतुक केले आहे.

# घातवार, १४ ठार!

## तीन वेगवेगळ्या घटनांमध्ये अनेकजण जखमी




■ **महासागर प्रतिनिधी/वृत्तसंस्था**
**मुंबई, पुणे, सारंगपूर, दि. १९ :**
राज्यातील ठाणे (मुंबई) आणि पुणे जिल्ह्यासह मध्यप्रदेशात झालेल्या तीन वेगवेगळ्या अपघातात १४ जण ठार तर अनेकजण जखमी झालेत.

पुणे जिल्ह्यातील जेजुरी -जेजुरी मोरगाव रोडवर किर्लोस्कर कंपनी जवळील श्रीराम ढाबा समोर स्विफ्ट कार आणि पिकअप टेम्पोमध्ये भीषण अपघात झाला. या अपघात ८ जण जागीच ठार, तर पाच जण गंभीर जखमी झाले.

जेजुरीहून मोरगावकडे भरधाव वेगाने जात असलेली स्विफ्ट डिझायर कार रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या पिकअप टेम्पोला धडकली. अपघातावेळी टेम्पोमधून सामान उतरवण्याचे काम सुरू होते. ही कार टेम्पोच्या बाजूला असलेल्या दुसऱ्या कारवर आदळली.

अपघातात टेम्पो मधील वस्तू खाली करणारे दोघेजण, श्रीराम ढाब्यासमोर उभे असणारे तिघे तर कार मधील तिघे जण जागेवरच ठार झाले. सोमनाथ वायसे, रामु संजीवन यादव (दोघेही रा. नाझरे कप ता. पुरंदर), अजय चव्हाण (रा. उत्तरप्रदेश) अजित जाधव (रा. कांजळे, ता. भोर), किरण राऊत, अक्षय राऊत, अश्विनी ऐसार, अशी मृतांची नावे असून अन्य एकाची ओळख पटली नाही. दोन मुले, एक महिला, दोन पुरुष अशा पाच जणांची प्रकृती गंभीर आहे.

**ट्रक-जीप धडकेत २ ठार**

ठाणे जिल्ह्यात समृद्धी महामार्गावर वाशिंद आणि आमणे दरम्यान क्रुझर जीप आणि ट्रक यांच्यात झालेल्या अपघातात २ जणांचा मृत्यू झाला असून ७ जण गंभीर जखमी झाले आहेत.

परभणी जिल्ह्यातील एक कुटुंब चारचाकीने भिवंडीच्या नातेवाईकांकडे येत होते. या वाहनाने समोर जात असलेल्या ट्रकला धडक दिली. त्यात २ प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला. तर ७ गंभीर जखमी झाले.

मृतांमध्ये अब्दुल पाशा शेख (६५) आणि जाहीद सिद्दिकी (४०) यांचा समावेश आहे. अपघातग्रस्तांमध्ये २ लहान मुले, ३ महिला आणि २ पुरुषांचा समावेश असून प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे.

## आई आणि मुलासह ४ जणांचा मृत्यू



मध्य प्रदेशातील राजगड जिल्ह्यातील पाचोर येथे महामार्गावर एक कार दुभाजकाला धडकली. अपघातात कारमधील दोन मुलांचा जागीच मृत्यू झाला, तर दोघांचा शाजापूर जिल्हा रुग्णालयात मृत्यू झाला. तीन जण जखमी झाले आहेत.कारमधील सर्व लोक अयोध्याहून सुरतला जात होते. राजगडमध्ये चालकाला झोप लागली, ज्यामुळे हा अपघात झाला. अहमदाबादला जाणाऱ्या रुग्णवाहिकेचा चालक आणि ट्रक चालकांनी गाडीचा दरवाजा तोडून मृतदेह आणि जखमींना बाहेर काढले.

अमेरिकेला पाठवला जाणार

## ड्रीमलायनरचा ब्लॅक बॉक्स

■ **वृत्तसंस्था, अहमदाबाद, दि. १९ :**
१२ जून रोजी अहमदाबादमध्ये कोसळलेल्या एअर इंडियाच्या विमानाचा ब्लॅक बॉक्स तपासासाठी अमेरिकेला पाठवला जाऊ शकतो.



विमानात आग लागल्यानंतर ब्लॅक बॉक्स इतका खराब झाला आहे की त्यातून डेटा मिळवणे कठीण झाले आहे. त्यामुळे तो तपासासाठी अमेरिकेला पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा निर्णय केंद्र सरकारने घ्यायचा आहे.
१२ जून रोजी लंडनला जाणारे एअर इंडियाचे विमान एआय-१७१ अहमदाबाद येथे उड्डाणानंतर लगेचच कोसळले. या घटनेत विमानातील २४१ जणांचा मृत्यू झाला, तर एक प्रवासी बचावला. या घटनेत एकूण २७५ जणांचा मृत्यू झाला. ब्लॅक बॉक्सचे दोन भाग - कॉकपिट व्हॉइस रेकॉर्डर आणि फ्लाइट डेटा रेकॉर्डर उष्णता आणि आगीमुळे खराब झाले. देशात अशी कोणतीही प्रयोगशाळा नाही जिथे डेटा पुनर्प्राप्त करता येईल. या कारणास्तव, आता त्यांना अमेरिकेच्या राष्ट्रीय वाहतूक सुरक्षा मंडळाच्या प्रयोगशाळेत पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सुरक्षा आणि गोपनीयता राखण्यासाठी सरकारी अधिकारी त्यांच्यासोबत असतील.

आतापर्यंत अहमदाबाद विमान अपघातात मृत्युमुखी पडलेल्या २११ जणांची डीएनए चाचणीद्वारे ओळख पटवण्यात आली आहे आणि १८९ मृतदेह त्यांच्या कुटुंबियांना सोपवण्यात आले आहेत.

## लुटियन्स झोनमधील सुनहरी बाग राहुल गांधींचा नवा पत्ता

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १९ :**
लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचा आज ५५ वा वाढदिवस आहे. आज राहुल सुनहरी बाग रोडवर बांधलेल्या टाइप-८ बंगल्यात स्थलांतरित झाले आहेत. हा बंगला त्यांना लोकसभेतील विरोधी पक्षनेते म्हणून देण्यात आला आहे.

५५ व्या वाढदिवशी शिफ्ट



संसदीय गृहनिर्माण समितीने त्यांना ५ सुनहरी बाग रोड, ७ मोतीलाल नेहरू मार्ग आणि ३ कृष्णा मेनन मार्ग बंगल्यांचा पर्याय दिला होता. यापैकी राहुल यांनी सुनहरी बाग निवडली. यापूर्वी राहुल गांधी सोनिया गांधींसोबत १० जनपथ येथे राहत होते. २०२३ मध्ये त्यांनी १२ तुघलक लेन येथील बंगला रिकामा केला, जो १९ वर्षांपासून त्यांच्याकडे होता.

## इराणच्या अणुभट्टीवर इस्त्रायलचा हल्ला : इराणने इस्त्रायली स्टॉक एक्सचेंज उडवले

### १७६ जखमी; आतापर्यंत ६३९ इराणी नागरिकांचा मृत्यू

■ **वृत्तसंस्था, तेहरान, दि. १९ :**
इस्त्रायलने इराणमधील अरक हेवी वॉटर रिॲक्टरवर हल्ला केला आहे. हल्ल्यानंतर झालेल्या नुकसानीची कोणतीही माहिती नाही.

काही तासांपूर्वी इस्त्रायली आर्मीने अरक आणि खोंडूब शहरांतील लोकांना हा परिसर रिकामा करण्याचा इशारा दिला होता.

अरकमध्ये एक हेवी वॉटर रिॲक्टर आहे. ही सुविधा इराणच्या अणुकार्यक्रमाचा एक महत्त्वाचा भाग आहे. यासोबतच अरकमध्ये मोठ्या प्रमाणात शस्त्रे तयार केली जातात.

याशिवाय, खोंडूबमध्ये एक हेवी वॉटर रिॲक्टर देखील आहे, जो इराणच्या अणुकार्यक्रमाचा आणखी एक महत्त्वाचा भाग आहे. ही सुविधा अरकपासून सुमारे ४० किलोमीटर अंतरावर आहे. अरकप्रमाणेच, त्यावर आंतरराष्ट्रीय देखरेख देखील ठेवण्यात आली आहे.

इराण आणि इस्त्रायलमधील युद्ध सातव्या दिवशी पोहोचले आहे. आतापर्यंत इस्त्रायलमधील २४ लोक मारले गेले आहेत. त्याच वेळी, वॉशिंग्टनस्थित एका मानवाधिकार गटाने दावा केला आहे की इराणमध्ये मृतांची संख्या आता ६३९ वर पोहोचली आहे आणि १३२९ लोक जखमी झाले आहेत. दोन्ही देशांमधील युद्ध भीषण रूप धारण करीत आहे.

## दोन विमानांचे आपत्कालीन लॅंडिंग

दिल्लीहून लेहला जाणारे इंडिगोचे विमान ६ ए २००६ हे तांत्रिक बिघाडामुळे गुरुवारी सकाळी दिल्लीला परतले. विमानात क्रू मेंबर्ससह १८० लोक होते.
याशिवाय, स्पाइसजेटचे विमानही उड्डाणानंतर १० मिनिटांनी परतले. हे विमान हैदराबादहून तिरुपतीला जात होते. विमानात एकूण ८० प्रवासी होते.
यापूर्वी बुधवारी एअर इंडियाची ३ उड्डाणे रद्द करण्यात आली होती. यामध्ये दिल्ली-बाली, टोरंटो-दिल्ली आणि दुबई-दिल्ली उड्डाणे यांचा समावेश होता.
सर्वप्रथम, दिल्लीहून बालीला जाणारे विमान एआय २१४५ मध्यातूनच दिल्लीला परतले. बाली विमानतळाजवळ ज्वालामुखीचा उद्रेक झाल्याच्या वृत्तांमुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेचा विचार करून हा निर्णय घेण्यात आल्याचे एअरलाइनने म्हटले आहे.
यानंतर, टोरंटोहून दिल्लीला जाणारे विमान एआय १८८ रद्द करण्यात आले. आधीच विमानात बसलेल्या प्रवाशांना खाली उतरवण्यात आले. विमानाच्या देखभालीमुळे आणि कर्मचाऱ्यांच्या उड्डाण कर्तव्याच्या वेळेच्या मर्यादेमुळे ते रद्द करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

## काँग्रेस नेतृत्वातील काही लोकांशी मतभेद

■ **वृत्तसंस्था, तिरुवनंतपुरम, दि. १९ :**
काँग्रेस खासदार शशी थरूर म्हणाले की, त्यांचे पक्षातील काही नेत्यांशी मतभेद आहेत. थरूर गुरुवारी तिरुवनंतपुरममध्ये पत्रकारांशी बोलत होते. ते म्हणाले, मी ज्या लोकांबद्दल बोलत आहे ते कोण आहेत. तुम्ही (मीडियाचे लोक) त्यांना चांगले ओळखता कारण त्यातील काही मुद्दे सार्वजनिक क्षेत्रात आहेत.



थरूर पुढे म्हणाले की, त्यांना काँग्रेस पक्ष आणि त्यांची तत्वे आवडतात. त्यांनी १६ वर्षांपासून पक्ष कार्यकर्त्यांसोबत जवळून काम केले आहे आणि ते त्यांना आपले जवळचे मित्र आणि भाऊ मानतात. थरूर यांनी त्यांचे मतभेद राष्ट्रीय नेत्यांशी आहेत की राज्य नेत्यांशी आहेत हे स्पष्ट केले नाही.

वर्ल्ड युनिव्हर्सिटी रॅंकिंग

## आयआयटी दिल्ली सर्वोत्तम

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :**
क्यूएस वर्ल्ड युनिव्हर्सिटी रॅंकिंग २०२६ जाहीर झाले आहे. गेल्या वर्षीप्रमाणे, मॅसॅच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी म्हणजेच एमआयटी यामध्ये अव्वल स्थानावर आहे.
यावर्षी रॅंकिंगमध्ये काही बदल झाले आहेत. यावर्षी आयआयटी दिल्ली देशात पहिल्या स्थानावर आहे. तर आयआयटी बॉम्बे दुसऱ्या स्थानावर आहे. या वर्षी देशातील ५४ विद्यापीठे आणि संस्थांना या यादीत स्थान मिळाले आहे, जे आतापर्यंतचे सर्वोच्च आहे. गेल्या वर्षी भारतातील ४६ विद्यापीठे आणि संस्थांना या यादीत स्थान मिळाले होते.
या वर्षी आयआयटी बॉम्बेला १२९ वा रॅंकिंग मिळाला आहे, तर गेल्या वर्षीच्या रॅंकिंगमध्ये ते ११८ व्या क्रमांकावर होते. याशिवाय, गेल्या वर्षी आयआयटी बॉम्बेला देशात पहिले स्थान मिळाले होते. या वर्षी आयआयटी दिल्ली पहिल्या क्रमांकावर आहे.

## अरण्यऋषी मारुती चित्तमपल्ली यांच्यावर अंत्यसंस्कार

■ **वृत्तसंस्था, सोलापूर, दि. १९ :**
पद्मश्री सन्मानित, पर्यावरण आणि वन्यजीव लेखक 'अरण्यऋषी' म्हणून ओळखले जाणारे ज्येष्ठ लेखक आणि माजी वनाधिकारी मारुती चितमपल्ली यांच्या पार्थिवावर आज गुरूवारी अंत्यसंस्कार करण्यात आले.



बुधवार १८ जून रोजी रात्री त्यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. ते ९३ वर्षांचे होते. सोलापूरमधील त्यांच्या राहत्या घरी सायंकाळी सात वाजता त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने भारतीय पर्यावरण आणि साहित्य क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. मारुती चितमपल्ली यांना ३० एप्रिल २०२५ रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला होता. मात्र, दिल्लीहून परतल्यानंतरच त्यांची प्रकृती खालावली होती. ते अंथरुणाला खिळले होते. गेल्या दहा दिवसांपासून त्यांनी अन्नत्याग केला होता व केवळ दूध व थोडेसे पाणी घेत होते.

त्यांचे वास्तव्य अक्कलकोट रोडवरील सूत मिल हेरिटेज, मनिधारी एम्पायर सोसायटी येथे होते. त्यांची अंत्ययात्रा गुरुवारी दुपारी घरापासून निघून रूपाभवानी मंदिराजवळील हिंदू स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आलेत.
अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांच्या निधनावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे, मंत्री छगन भुजबळ यांच्यासह अनेकांनी शोक व्यक्त केला.
प्रतिभावंत लेखक, आंतरराष्ट्रीय कीर्तीचक पक्षीशास्त्रज्ञ व वन्यजीव अभ्यासक अशी मारुती चित्तमपल्ली यांची ओळख आहे. मारुती चितमपल्ली यांनी वन खात्यात ३६ वर्षे सेवा केली. त्या काळात देशभर संशोधकवृत्तीने भटकंती केली. या भटकंतीत ५ लाख किमी प्रवास, १३ भाषांचे ज्ञान याद्वारे आदिवासी व इतर जमातींशी संवाद साधत माहिती मिळवली. त्या माहितीची नोंद केलेल्या व ३० वर्षे जपून ठेवलेल्या शेकडो डायऱ्या आहेत.
डायरीतील नोंदीला शास्त्रीय आधार देत पक्षिकोश, प्राणिकोश व मत्स्यकोशाचे लेखन पूर्ण केले. अरण्यवाचनासह प्राणी, पक्षी, वनस्पतीची वैशिष्ट्यांसह वन्य जीवन विषद करणारी २५ पुस्तके लिहिली. अनेक वर्ष ते विदर्भातील नवेगाव बांध येथे वास्तव्यास होते.

# ज्यांना राजकारणात मुले होत नाहीत...

### वर्धापनदिन मेळाव्यात उद्धव ठाकरे गरजले

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :**
शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या शिवसेनेचा वर्धापन दिन सोहळा सायन येथील षण्मुखानंद सभागृहात पार पडला. यावेळी उद्धव ठाकरे यांनी शिंदेसेनेसह भाजपावर सडकून टीका केली.

आज सगळीकडे लागलेल्या बॅनरवर शिवसेना प्रमुखांचे फोटो आहेत. जे आपला बाप बदलाल आणि ज्यांना राजकारणात पोरं होत नाहीत, अशी लोक आपल्या घराणेशाहीवर टीका करतात, तेव्हा मला त्यांची कीव येते. तुला राजकारणात पोरं होत नाहीत, त्याला आम्ही काय करू. आमच्याकडे आहेत, घ्यायची तर घे. किती पाहिजेत? कारण भाजप असाच आहे, अशा शब्दांत उद्धव ठाकरे यांनी निशाणा साधला.

निवडणूक जिंकण्यासाठी माता भगिनीशी केलेला वादा,




जनतेशी केलेला वादा पाळत नाही. मग तो पक्ष माझ्याशी केलेला वादा कसा पाळतील. आज देशाला पंतप्रधानांची गरज आहे. भाजपला पंतप्रधान आहे. देशाला नाही.

आज ज्यांना दाढी फुटली आणि दाढी खाजवत आहेत, ते शिवसेनेच्या पहिल्या मेळाव्यात कुठे असतील याची मला कल्पना नाही, असे म्हणत उद्धव ठाकरे यांनी एकनाथ शिंदेंना टोला लगावला.

# वेगाने रंग बदलणारा सरडा महाराष्ट्राने पाहिला...

### एकनाथ शिंदे यांची जहरी टीका

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :**
उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेचा मेळावा वरळीतील एनएससीआय डोम येथे पार पडला. एकनाथ शिंदे यांनी कार्यकर्त्यांना संबोधित करताना, उद्धव ठाकरे यांचे नाव न घेता जहरी टीका केली.

उद्धव ठाकरे हे सत्तेसाठी लाचार झाले. त्यांनी हिंदुत्त्व बाजूला सोडून दिलं. महाराष्ट्रातील जनतेशी प्रतारणा केली. मतदारांना धोका दिला. उद्धव ठाकरे हे सत्तेसाठी अगतिक, लाचार झाले, त्यांना पुन्हा हिंदुत्त्व, मराठी माणूस आठवत आहे, असा हल्लाबोल एकनाथ शिंदे यांनी केला. मतदारांनी ठाकरे गटाला कधीच टाटा-बाय-बाय केलंय. आपल्याकडे आत्मविश्वास आहे. त्यांच्याकडे अहंकार आहे. हा अहंकार त्यांना विनाशाकडे



नेतोय. सरडाही रंग बदलतो. पण इतक्या वेगाने रंग बदलणारा सरडादेखील महाराष्ट्राने पाहिला. त्यांचेच सगेसोयरे, भाऊबंद हे सांगत आहेत, अशी थेट टीका एकनाथ शिंदे यांनी केली.

मुख्यमंत्रिपदासाठी ते लाचार झाले. ते काय बाळासाहेब ठाकरे यांच्या विचाराचे वारसदार होणार? बाळासाहेब असते तर खुर्चीसाठी लाचार लोकांना त्यांनी उलटं टांगून खालून मिरचीचा धूर दिला असता. हिंदुत्त्व आणि मराठी माणसाशी विश्वासघात केल्यामुळे ते आता उतावीळ, लाचार झाले आहेत, अशी थेट टीकाही शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर केली.

कार्यक्रमादरम्यान खासदार मिलिंद देवरा आणि श्रीकांत शिंदे यांची मुलाखत घेण्यात आली. या दोघांनीही ठाकरे गटावर शरसंधान साधले.

## 'मातोश्री'वर सध्या बंगाली बाबाचा वावर : संजय शिरसाट



**मुंबई :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी कॅबिनेट मंत्री भरत गोगावले यांच्यावर केलेला अघोरी पूजेचा आरोप सत्ताधारी शिवसेनेने जोरकसपणे फेटाळून लावला आहे. भरत गोगावले हे पूजापाठ करणारे आहेत. पण मातोश्रीचे बंगाली बाबा कनेक्शन काय आहे हे संजय राऊतांनी सांगावे. मातोश्रीवर रोज एका बंगाली बाबाचा वावर असतो. या बाबाच्या सूचनेनुसार उद्धव ठाकरे यांचे सर्वकाही ठरते, असे शिवसेना नेते तथा मंत्री संजय शिरसाट यांनी म्हटले आहे. सध्या भरत गोगावले यांचा एक अघोरी पूजा करतानाचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. ठाकरे गटाचे पदाधिकारी वसंत मोरे व राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते सूरज चव्हाण यांनी हा व्हिडिओ शेअर केला आहे. संजय राऊत यांनी या व्हिडिओवर प्रतिक्रिया देताना एकनाथ शिंदेंवर निशाणा साधला होता. अघोरी विद्येमध्ये रममाण असणारे मंत्री महाराष्ट्राचे काय भले करणार? असा सवाल त्यांनी उपस्थित केला होता. पत्रकारांनी याविषयी गुरूवारी संजय शिरसाट यांना छेडले असता त्यांनी गोगावलेंवरील टीका धुडकावून लावली. तसेच संजय राऊतांना मातोश्रीचे बंगाली बाबा कनेक्शन सांगण्याचे आव्हानही दिले. संजय शिरसाट म्हणाले, व्हायरल व्हिडिओद्वारे भरतशेठ गोगावले हे पूजापाठ करणारे असल्याचे महाराष्ट्राला कळले. अघोरी पूजा अशी कॅमेऱ्यावर होत नाही.

# विचाराधीन बंद्यांना न्यायाचा मार्ग दाखवणारा विधी साहाय्य उपक्रम : मुख्यमंत्री

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :** कारागृहांमधील विचाराधीन बंद्यांसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून २०१८ मध्ये सुरू केलेल्या देशातील पहिल्या विधी साहाय्य उपक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या उपक्रमामुळे जवळपास २० हजार विचाराधीन बंद्यांना लाभ झाला आहे. त्यापैकी ९ हजार म्हणजेच ४५ टक्के बंदी विविध कायदेशीर प्रक्रियांद्वारे मुक्त करण्यात आले आहेत. या उपक्रमाचे महत्व म्हणजे, केंद्र शासनाने देश पातळीवर हा उपक्रम स्वीकारला असून अंमलबजावणीसाठी आर्थिक तरतूदही केली आहे.




प्रिझन स्टॅटिस्टिक्स इंडिया रिपोर्ट २०२१नुसार, भारतातील कारागृहांमधील बंद्यांचा सरासरी दर १३० असून त्यामध्ये सुमारे ७७ टक्के बंदी हे विचाराधीन (अंडर ट्रायल) आहेत. या बंद्यांबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुढाकार घेत उद्योगपती अजीम प्रेमजी यांच्याशी चर्चा केली. त्यांच्या फाउंडेशनसोबत सामंजस्य करार करीत देशातील पहिला विधी साहाय्य उपक्रम सुरू केला.

कायदेशीर प्रतिनिधीत्वाच्या अभावामुळे किंवा जामीन घेण्याची आर्थिक क्षमता नसल्यामुळे अजूनही शिक्षा न ठरलेले बंदीजन आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून सुरू असलेल्या या उपक्रमामुळे विचाराधीन बंदी कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करीत आहेत.

विचाराधीन बंदीगृहातील बंद्यांना न्याय मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने अजीम प्रेमजी फाउंडेशन आणि अंमलबजावणी भागीदार टाटा सामाजिक विज्ञान संस्था (टी आय एस एस) आणि राष्ट्रीय विधी विद्यापीठ, दिल्ली यांच्या सहकार्याने सुरू केलेल्या विधी साहाय्य उपक्रमाने राज्यभरात महत्त्वपूर्ण प्रगती केली आहे. हा उपक्रम महाराष्ट्रातील आर्थर रोड, भायखळा, कल्याण, तळोजा, लातूर, ठाणे, पुणे आणि नागपूर या आठ प्रमुख कारागृहात प्रभावीपणे राबविला जात आहे.

या ठिकाणी सामाजिक कार्य व कायदा फेलोज यांची नेमणूक कारागृहांमध्ये तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणांमध्ये करण्यात आली आहे. हे तज्ञ्ज बंद्यांना प्रकरणाच्या तयारीसाठी, न्यायालयीन प्रक्रियेत मार्गदर्शन करतात आणि प्रभावी विधी प्रतिनिधित्व मिळवून देतात.

या उपक्रमामुळे विधी साहाय्य व्यवस्थेत मूलभूत सुधारणा झाल्या असून सेवांमध्ये समन्वय वाढला आहे. दुर्बल व संवेदनशील बंद्यांसाठी न्यायाची उपलब्धता सुधारली आहे आणि धोरणात्मक स्तरावरही महत्त्वपूर्ण प्रगती झाली आहे. या यशस्वी उपक्रमामुळे राज्य शासनाने अजीम प्रेमजी फाउंडेशनसोबतच्या सामंजस्य कराराचे नूतनीकरण केले आहे. या उपक्रमाचा दीर्घकालीन पद्धतीने राबवीत विस्तार करण्यात येत आहे. या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे.

माहिती व्यवस्थापन बळकट करणे, कारागृह विधी 'क्लिनिक' ची कार्यक्षमता वाढवणे आणि संस्थात्मक क्षमता वृद्धिंगत करणे यावर पुढील टप्प्यात भर दिला जाणार आहे. या पुढाकारामुळे गृह विभागाच्या महाराष्ट्र राज्य कारागृह सुधारणा शाखेने विधी साहाय्य व सुलभता या क्षेत्रात देशासाठी एक आदर्श निर्माण केला आहे.

## सोलापूर महानगरपालिकेतील कामगारांना नियमित करण्यासाठी प्रस्ताव पाठवा : अण्णा बनसोडे



**मुंबई:** सोलापूर महानगरपालिकेतील विविध खात्यांमध्ये १९९५ नंतर रुजू झालेल्या पण नियमित न झालेल्या कामगारांच्या सेवा नियमित करण्यासाठी महानगरपालिकेने ठरावासह परिपूर्ण प्रस्ताव शासनास पाठवावा, अशा सूचना विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी दिल्या. विधिमंडळात उपाध्यक्ष श्री. बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. यावेळी बैठकीस सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओंबासे दूरदृष्य प्रणालीद्वारे तसेच अतिरिक्त आयुक्त रवी पवार, नगरविकास विभागाचे अवर सचिव वाणी, कामगारांचे प्रतिनिधी व पदाधिकारी उपस्थित होते. सोलापूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यरत जवळपास २४९ कामगार नियमित करण्यात आलेले नाहीत. महानगरपालिकेचा आस्थापना खर्च विहित मर्यादेच्या पुढे गेला असल्याने अहवाल पाठविण्यात आला होता. परंतु या कामगारांना नियमित करण्याच्या दृष्टीने परिपूर्ण प्रस्ताव ठरावासह शासनास पाठवण्यात यावा, असे विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी यावेळी सांगितले.

## मुंबईकर महिलेवर पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याचा आरोप ठेवून २२ लाखांना फसवले

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :** ऑनलाईन फसवणुकीला बळी पडल्यामुळे अनेकांचे लाखोंचं तर काहींचं कोट्यवधींचं नुकसान होत असल्याच्या घटना गेल्या काही काळात समोर आल्या आहेत. यात वेबसाईटवरील लिंकच्या माध्यमातून फसवणूक करण्यापासून फोनवर कार्डचा किंवा बँक व्यवहाराचा ओटीपी मागण्यापर्यंत अनेक मार्गांचा समावेश आहे. पण आता या ऑनलाईन फसवणुकीचा नवा प्रकार समो आला आहे. मुंबईत एका वृद्ध महिलेला चक्क पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याचा आरोप करून तब्बल २२ लाखांना गंडा घातल्याची बाब नुकतीच समोर आली आहे. अशा प्रकारे हेरगिरीचा आरोप करून फसवणूक केल्याचा हा पहिलाच प्रकार मानला जात आहे.

मुंबईत एका ६४ वर्षाच्या वृद्ध महिलेची पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याचा आरोप करून तब्बल २२ लाख ४० हजारांची फसवणूक केली आहे. बुधवारी हा प्रकार समोर आला आहे.

सदर महिला गिरगावमध्ये वास्तव्यास असून आपली फसवणूक झाल्याचं लक्षात येताच या महिलेनं गेल्या आठवड्यात यासंदर्भात साऊथ रीजन सायबर पोलिसांकडे यासंदर्भात तक्रार दाखल केली. त्यानंतर बुधवारी मुंबई पोलिसांनी दिलेल्या माहितीनंतर हे सगळं प्रकरण चर्चेत आलं आहे. ५ ते १० जून यादरम्यान हे सर्व फोन कॉल्स आणि फसवणूक झाल्याचं या महिलेनं तक्रारीत म्हटलं आहे.

सदर महिलेनं दिलेल्या तक्रारीनुसार, काही अनोळखी क्रमांकांवरून त्यांना फोन आले. आपण दिल्ली एटीएस अर्थात दहशतवादविरोधी पथकाचे अधिकारी प्रेम कुमार गुप्ता बोलत असल्याचं पलीकडील व्यक्तीने सांगितलं. तसेच, आपण जम्मू-काश्मीर बॉर्डर पोलीस स्थानकात सध्या रुजू असल्याचंही या व्यक्तीने सांगितलं.

# आदिवासींचा निधी अन्यत्र वळवण्यास विरोध

## आदिवासी आमदारांनी घेतली राज्यपालांची भेट

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :** अर्थसंकल्पात अनुसूचित जमाती अर्थात आदिवासी समाजाच्या विकासासाठी तरतूद करण्यात आलेला निधी अन्यत्र वळवण्यास आदिवासी आमदारांनी तीव्र विरोध केला आहे. या आमदारांचा रोख मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेकडे आहे. यासंदर्भात सत्ताधारी पक्षाच्या आदिवासी आमदारांनी बुधवारी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची भेट घेऊन आदिवासी विकास निधी आदिवासींच्या योजनांसाठीच वापरावा, अशी आग्रही मागणी केली.

राज्य सरकारने आपल्या महत्वाकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी सामाजिक न्याय आणि आदिवासी विकास विभागाच्या निधीला हात घेतला आहे. त्यानुसार आदिवासी विकास विभागाकडून दर महिन्याला ३३५ कोटी ७० लाख रुपये घेतले जातात. या पार्श्वभूमीवर अन्न औषध प्रशासन नरहरी झिरवाळ यांच्या नेतृत्वाखालील आदिवासी समाजाच्या आमदारांच्या शिष्टमंडळाने आज राजभवनावर जाऊन राज्यपालांची भेट घेतली. त्यावेळी राज्यपालांनी आदिवासी विकासासाठीचा राखीव निधी आदिवासी विकास योजनांसाठीच वापरला जावा. आदिवासींसाठी असलेल्या आरक्षणाचा लाभ आदिवासींनाच व्हावा, बोगस आदिवासी प्रमाणपत्रधारकांवर कडक कारवाई करावी तसेच पेसा भागांच्या विकासावर विशेष लक्ष देण्यासंदर्भात आपण आग्रही असून न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिनस्त राहून पेसा भागात आदिवासी कर्मचाऱ्यांची पदभरती करण्यासंदर्भात आपण मुख्यमंत्र्यांशी चर्चा करू, असे आश्वासन आमदारांना दिले.

यावेळी पेसा क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या भरती संदर्भात सध्याच्या आदेशातील विसंगती दूर करणे, अवैधरित्या जात प्रमाणपत्र रोखण्यासंदर्भातील कायदा करणे, आदिवासी विद्यापीठाची स्थापना करणे, प्रलंबित वनदावे निकाली काढणे यांसह विविध विषयांवर बैठकीत चर्चा झाली. आदिवासी सल्लागार परिषदेची बैठक वर्षातून किमान दोनदा व्हावी, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

आदिवासी मुले, मुली मुंबई आणि पुण्यात शिक्षणासाठी येतात. त्यांच्या वसतिगृहांसाठी मुंबई, पुण्यातील विद्यापीठ परिसरात जागा उपलब्ध करून दिल्यास आदिवासी विकास विभाग वसतिगृहे बांधून देईल, अशी माहिती आदिवासी विकासमंत्री अशोक उइके यांनी राज्यपालांना दिली.

तर राज्यपाल हे राज्यातील आदिवासी भागांचे पालक असल्याने त्यांनी राज्यातील आदिवासी लोकप्रतिनिधी आणि सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधींची प्रत्येक विधानमंडळाच्या सत्राच्या वेळी बैठक घ्यावी, अशी विनंत झिरवाळ यांनी यावेळी केली.

## देशात डी कंपनीचे राज्य, डरपोकांची सत्ता

## संजय राऊत यांचा आरोप



**मुंबई :** देशामध्ये आज डी कंपनीचे राज्य सुरू आहे. भाजपचे म्हणजे डरपोक म्हणजे डी कंपनीचे राज्य आहे. महाराष्ट्रात खरोखरची डी कंपनी आहे त्यांचे राज्य आहे. दाऊदपासून ते मिर्चीपर्यंत अनेक गुंड आणि त्यांचे हस्तक देशद्रोही यांना सोबत घेऊन डी कंपनी महाराष्ट्रात राज्य करत आहे, असे म्हणत खासदार संजय राऊत यांनी महायुतीवर हल्लाबोल केला आहे. संजय राऊत पुढे बोलताना म्हणाले की, एका ठिकाणी प्रत्यक्ष दाऊद आणि एका ठिकाणी डरपोक लोकांचे राज्य आहे. या दोन डी विरुद्ध शिवसेना हा एकमेव पक्ष ताकदीने लढत आहे. आमच्या पाठीवर वार करत काही लोकं निघून गेले पण आम्ही छातीवर वार सहन करत लढणाऱ्यांचा हा पक्ष आहे, असेही त्यांनी यावेळी बोलताना म्हटले आहे. संजय राऊत म्हणाले की, एकनाथ शिंदेंच्या पक्षाचे संस्थापक अमित शहा आहेत. त्यांचा आणि बाळासाहेब ठाकरे यांचा काही संबंध नाही. त्यांनी त्यांच्या पक्षाचा वर्धापनदिन हा सुरत, अहमदाबादमध्ये साजरा करायला हवा, असा टोला राऊतांनी लगावला आहे. अमित शहा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वप्न आहे की मराठी माणसांच्या एकजुटीला तडे जावे. त्यांच्यामध्ये भ्रम निर्माण व्हावा.

# पुणे, रायगड, नाशिक येथे पावसाचे धूमशान

**■ महासागर प्रतिनिधी, रायगड, दि. १९ :** कोकण पट्ट्यातील रायगड जिल्ह्यात बुधवारी रात्रीपासून जोरदार पाऊस सुरू झाला आहे. परिणामी, जिल्ह्यातील खेड व नागोठणे शहरात पुरस्थिती उद्भवली आहे. खेडमध्ये जगबुडी नदीने इशारा पातळी ओलांडली असून, नदीचे पाणी थेट शहरातील मार्केट परिसरात शिरले आहे. मुसळधार पावसामुळे जिल्हा प्रशासनाने शाळा व महाविद्यालयांना सुट्टी जाहीर केली आहे. दरम्यान, पुणे जिल्ह्यात पावसाची संततधार कायम असल्यामुळे खडकवासला धरणातून 2 हजार क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे.



रायगड जिल्ह्यात बुधवारी रात्रीपासून मुसळधार पाऊस सुरू आहे. परिणामी, पाली पोलिस ठाणे हद्दीतील अंबा नदीवरील पाली - खोपोली रोडवर नदीचे पाणी आले आहे. त्यामुळे हा रस्ता रहदारीसाठी बंद करण्यात आला आहे. या मार्गावरिल उन्हेरे फाटा येथील पूल पाण्याखाली गेला आहे. येथे कोणतीही दुर्घटना होऊ नये यासाठी पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. सुधागड तालुक्यातील खुरावले फाटा येथील भेराव गावाकडे जाणाऱ्या अंतर्गत रोडवरील पुलही पाण्याखाली गेल्यामुळे हा मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे.

हवामान खात्याने रायगड जिल्ह्यात आज सलग दुसऱ्या दिवशी मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. त्यामुळे जनजीवन आणखी विस्कळीत होण्याची शक्यता आहे. खेड तालुक्यातील जगबुडी नदीने इशारा पातळी ओलांडली आहे. या नदीचे पाणी आता शहरातील मटण मार्केटमध्ये येण्यास सुरुवात झाली आहे. पावसाचा जोर असाच कायम राहिला तर स्थिती बिघडून हे पाणी मुख्य मार्केटमध्ये पोहोचण्याची शक्यता आहे. स्थानिक प्रशासन या प्रकरणी परिस्थितीवर बारीक लक्ष ठेवून आहे. खेड नगरपरिषदेने नागरिकांना सतर्कतेची सूचना दिली आहे.

मुसळधार पावसामुळे जगबुडीच नव्हे तर नारंगी नदीलाही पूर आला आहे. यामुळे खेड शहरातील अंतर्गत रस्ते पाण्याखाली गेले आहेत. घाटमाथ्यावरील पाणलोट क्षेत्रात पाऊस सुरू असल्यामुळे नागोठणे शहरातील रस्तेही जलमय झालेत. येथील अनेक घरांमध्ये पावसाचे पाणी शिरले आहे. पुढील काही तास असाच पाऊस सुरू राहिला तर येथील बहुतांश घरे पाण्याखाली जाण्याची भिती आहे. प्रशासनाने खबरदारी म्हणून बोटी रस्त्यावर उतरवल्या आहेत.

दुसरीकडे, हवामान खात्याने आज रायगड जिल्ह्याला ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. तसेच पुढील काही तासांमध्ये पावसाचा जोर वाढण्याचाही इशारा दिला आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने सर्व शाळा व महाविद्यालयांना सुट्टी जाहीर केली आहे.

## डॉ. श्रीपाल सबनीस यांचा गौरव समारंभ

**■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. १९ :** महाराष्ट्र साहित्य कला प्रसारिणी सभा, पुणे आणि महाराष्ट्रातील साहित्य, कला, संस्कृती या क्षेत्रात कार्य करणाऱ्या ७५ संस्थांच्या वतीने महाराष्ट्रातील प्रसिद्ध विचारवंत आणि ८९ व्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त त्यांचा गौरव समारंभाचे आयोजन रविवार दिनांक २२ जून २०२५ रोजी करण्यात आले आहे. यानिमित्त ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय कृषी मंत्री पद्मविभूषण शरद पवार यांच्या हस्ते सबनीस यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

याप्रसंगी डॉ. श्रीपाल सबनीस लिखित 'विवेकाची पेरणी' आणि राजकारणाच्या पंचनामा आणि सुनिताराजे पवार संपादित 'विवेकवादी डॉ. श्रीपाल सबनीस : विचार आणि वारसा' या दोन ग्रंथांचे प्रकाशन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे भूषविणार असून प्रमुख पाहुणे म्हणून रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, खासदार ओमराजे निंबाळकर आणि आमदार कैलास पाटील आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## विद्यार्थिनीची कॉलेजवरून उडी

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :** एका 21 वर्षीय महाविद्यालयीन तरुणीने कॉलेजच्या इमारतीवरून उडी मारून स्वतःची जीवनयात्रा संपवल्याची दुःखद घटना मुंबईत घडली घडली आहे. सकृतदर्शनी ही घटना आत्महत्येची असल्याचा दावा केला जात आहे. पण विद्यार्थिनीच्या कुटुंबीयांनी या प्रकरणी घातपाताचा संशय व्यक्त केला केला आहे. यामुळे ही हत्या की आत्महत्या याविषयी संभ्रमावस्था आहे. यासंबंधीच्या माहितीनुसार, मुंबईच्या विलेपार्ले भागातील साठ्ये कॉलेजमध्ये गुरूवारी सकाळी ही घटना घडली आहे. संध्या पाठक असे मृत विद्यार्थिनीचे नाव आहे. संध्या ही साठ्ये महाविद्यालयात अभियांत्रिकीच्या तिसऱ्या वर्षात शिकत होती. आज सकाळी तिचा मृतदेह महाविद्यालयाच्या प्रांगणात इमारतीवरून पडल्याच्या स्थितीत आढळला. त्यानंतर एकच खळबळ माजली. महाविद्यालय प्रशासनाने संध्याच्या कुटुंबीयांना तिचा तिसऱ्या मजल्यावरून पडल्यामुळे मृत्यू झाल्याचे कळवले. पण हा आत्महत्येचा प्रकार असल्याची चर्चा साठ्ये कॉलेजमध्ये रंगली. सध्या विलेपार्ले पोलिस पुढील तपास करत आहेत.



पोलिसांनी या प्रकरणी महाविद्यालयाचे सीसीटीव्ही फुटेज तपासले आहे. त्यात संध्या कॉलेजच्या इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरील कॉरिडोअरमधून चालत जाताना दिसून येत आहे. ती तेथून पडल्यानंतर तत्काळ तिला बाबासाहेब गावडे चॅरिटेबल ट्रस्ट रुग्णालयात दाखल करण्यात आले. पण उपचारापूर्वीच तिला मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.

मृत विद्यार्थिनीच्या कुटुंबीयांनी आपल्या मुलीने आत्महत्या केली नसून, कुणीतरी तिचा घातपात केल्याचा संशय व्यक्त केला आहे. आमच्या मुलीने आत्महत्या केली नाही. तिला कुणीतरी पाठीमागून ढकलले असावे, असे त्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे पोलिस सर्वच अंगांनी या घटनेचा तपास करत आहेत.

## अजित दादांना पदाची हाव नाही : हसन मुश्रीफ



**मुंबई :** सहकार क्षेत्र पारदर्शक ठेवा, बदनामीची संधीच उरू देऊ नका, असा स्पष्ट सल्ला देत वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी अनेक मुद्द्यांवर परखड भूमिका मांडली. माळेगावच्या सहकारी संस्थेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ते बोलत होते. यावेळी त्यांनी अजित पवार, जयंत पाटील, तटकरे, शिवसेना युती आणि राष्ट्रवादीतील दुही यावर थेट भाष्य करत राजकीय वतुर्ळात खळबळ उडवून दिली. हसन मुश्रीफ म्हणाले, अजित दादांनी पूर्वी अनेक पदांचा त्याग केला आहे. त्यांना पदासाठी राजकारण करायचं नाही. माळेगावच्या सहकारी निवडणुकीतून देशासमोर आदर्श निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. सहकारी संस्था कशा पारदर्शकपणे चालवाव्यात याचा दादा आदर्श देऊ इच्छितात. अजित पवारांविरोधात सहकार क्षेत्रात अनेक आरोप केले जात आहेत. यावर प्रतिक्रिया देताना मुश्रीफ म्हणाले, "ही सगळी बदनामी करण्याची योजना आहे. विधानसभा निवडणुकीत दादांनी एक लाख मताधिक्याने विजय मिळवला होता, हे विसरू नका." शिवसेनेसोबतच्या युतीबाबत विचारले असता, "आम्हाला त्याबद्दल काही माहिती नाही," असे सांगत त्यांनी रायगडच्या पालकमंत्रीपदावरील वादात मुख्यमंत्री लवकरच तोडगा काढतील.

## पवार कुटुंब म्हणजे दरोडेखोरांची टोळी

## लक्ष्मण हाकेंचा सवाल



**पुणे :** यशवंतराव चव्हाण यांचे नाव घेण्याचा अधिकार उपमुख्यमंत्री अजित पवार किंवा पवार कुटुंबियांना आहे का? या प्रश्नाचे उत्तर मिळणे गरजेचे आहे, असे ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी म्हटले आहे. तर मी नेहमी म्हणतो की अजित पवार हे कारखानदारांचे नेते आहेत. ही लुटारुंची टोळी आहे. यात सर्वसामान्य माणूस भरडला जात आहे. लक्ष्मण हाके म्हणाले की, अजित पवारांकडून लोकशाहीचा खून पाडण्याचे काम होत आहे. ते राज्याचे उपमुख्यमंत्री असताना त्यांना केवळ माळेगाव सहकारी साखर कारखाना निवडणुकीत रस आहे. हे निवडणुका जिंकण्याचे अड्डे बनले आहेत. अजित पवार अर्थमंत्रीपदावर यासाठीच राहतात कारण ते राज्याच्या तिजोरीवर दरोडा टाकतात आणि यांच्या संस्थांना मोठे करतात.

लक्ष्मण हाके म्हणाले की, महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीत असाच गैरप्रकार झाला होता. अशाच रात्री-अपरात्री बँका उघड्या राज्याने पाहिल्या होत्या. जरी लोकं सात्यत्याने निवडून येतात ना ती जनभावनेवर नाही तर अशा काळ्याकृत्यावर निवडून येत असतात.

## प्रयोगात्मक कलांच्या अभ्यासासाठी आता शाहीर साबळे संशोधन केंद्र : आशिष शेलार

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९** महाराष्ट्रातील पारंपरिक आणि प्रयोगशील कलांचा अभ्यास व संशोधनासाठी आता समर्पित केंद्र स्थापन होणार आहे. पु.ल. देशपांडे कला अकादमीत लवकरच 'शाहीर साबळे संशोधन केंद्र' सुरु करण्यात येणार असल्याची घोषणा सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केली.



राज्य सरकारच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे प्रयोगात्मक कलांचा दस्तऐवज तयार करणे, त्यांचे वर्गीकरण आणि सखोल विश्लेषण, या उद्देशाने हे केंद्र सुरू होणार असून, याचा उपयोग पदवी, पदव्युत्तर आणि पीएच.डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांना संशोधनासाठी होईल, अशी माहिती त्यांनी दिली.

या संशोधन केंद्राच्या स्थापनेसाठी आज मंत्रालयात सांस्कृतिक विभागाची उच्चस्तरीय बैठक घेण्यात आली. यामध्ये मंत्री शेलार यांनी केंद्राचा आराखडा त्वरीत तयार करण्याचे आदेश दिले. नाटक, लोककला, संगीत, नृत्य, कीर्तन, पोवाडा, तमाशा, वगनाट्य, दशावतार, भारुड या सर्व पारंपरिक व लोककला प्रकारांचा अभ्यास केंद्रात केला जाणार आहे.

केंद्राला शाहीर साबळे यांचे नाव देण्यामागची भूमिका स्पष्ट करताना मंत्री शेलार म्हणाले, "संयुक्त महाराष्ट्र चळवळीपासून ते तमाशा, पोवाडा, लोकगीतांच्या माध्यमातून समाजप्रबोधन करणारे पद्मश्री शाहीर कृष्णराव साबळे यांचे कार्य अविस्मरणीय आहे. त्यांच्या नावाने संशोधन केंद्र उभारणे हा महाराष्ट्र संस्कृतीला अभिवादन आहे."

या बैठकीस सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक बिभीषण चवरे, लोककला अभ्यासक प्रकाश खांडगे तसेच विभागातील अधिकारी उपस्थित होते.राज्यात अकृषी विद्यापीठांच्या माध्यमातून काही प्रयोगात्मक कलांवर कार्य सुरू आहे, त्यांच्यासह संलग्नता ठेवत एकात्म अभ्यासाची मांडणी करण्यात येणार आहे.

मंत्री शेलार पुढे म्हणाले की, "प्रयोगात्मक कला म्हणजे महाराष्ट्राची ओळख आहे. त्यामागे लोकजीवन, इतिहास आणि संस्कृतीचे दर्शन आहे. या कलांचं वैज्ञानिक पद्धतीने वर्गीकरण, दस्तऐवजीकरण आणि जागतिक स्तरावर परिचय व्हावा, यासाठी हे संशोधन केंद्र क्रांतिकारी ठरणार आहे." या ऐतिहासिक निर्णयामुळे महाराष्ट्रातील कलावंत, संशोधक आणि विद्यार्थ्यांसाठी नव्या संधींचे दार खुले झाले.

# पक्षीतज्ज्ञ डॉ. सलीम अली

आज २० जून, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे पक्षीतज्ज डॉ. सलीम अली यांचा आज स्मृतिदिन. २० जून १९८७ रोजी डॉ. सलीम अली यांचे निधन झाले होते. पक्षीतज्ज्ञ डॉ. सलीम अली यांचा जन्म १२ नोव्हेंबर १८९६ रोजी मुंबईत एका गरीब मुस्लिम कुटुंबात झाला. त्यांचे पूर्ण नाव सलीम मोईनुद्दीन अब्दुल अली असे होते. डॉ. सलीम अली हे एक वर्षाचे असतानाच त्यांच्या वडिलांचे तर दोन वर्षाचे असतानाच आईचे निधन झाले. अगदी बालवयातच आई वडिलांचे छत्र हरपलेल्या सलीम अलींचा सांभाळ त्यांच्या मामांनी केला.

सलीम अली यांना लहानपणापासून पक्षी निरीक्षणाची आवड होती. वयाच्या नवव्या वर्षी त्यांनी गळ्यावर पिवळा डाग असलेली चिमणी विकत घेतली होती. हा पक्षी कोणता आहे? त्याचे नाव काय आहे? हे त्यांना माहीत नव्हते म्हणून ते माहीत करून घेण्यासाठी ते त्या चिमणीला घेऊन मामांकडे गेले मामांनी सरळ त्याला बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या संचालकाकडे घेऊन गेले. तिथे संचालकांनी सलीम अलींना त्या पक्षाची सविस्तर माहिती सांगितली तसेच संस्थेतील भुसा भरलेल्या पक्षांचा संग्रह दाखवला. तो क्षण डॉ. सलीम अलींच्या आयुष्याला कलाटणी देणारा ठरला. त्या क्षणी त्यांच्यावर पक्षांची जी भुरळ पडली ती कायमचीच. त्यानंतर त्यांना पक्षी निरीक्षणाचा छंद जडला. १९१३ साली मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर डॉ. सलीम अली यांनी सेंट झेव्हीयर महाविद्यालयात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतला. लहानपणापासून पक्षी निरीक्षणाची आवड असल्याने सलीम अली यांनी उच्च शिक्षणासाठी प्राणी विज्ञान हा विषय निवडला.

या विषयात त्यांना बी ए ऑनर्स ही पदवी मिळवली मात्र ही पदवी विद्यापीठाच्या समकक्ष समजली जात नव्हती त्यामुळे त्यांना भारतीय प्राणी वैज्ञानिक सर्व्हेक्षण संस्थेत नोकरी मिळू शकली नाही. मात्र बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीत त्यांना व्याख्याता म्हणून नोकरी मिळाली. त्यानंतर ते जर्मनीची राजधानी बर्लिनला गेले तेथे जाऊन त्यांनी पक्षी शास्त्रावर प्रशिक्षण घेतले तिथे त्यांना जगप्रसिद्ध पक्षीतज्ज्ञ एर्विन स्ट्रेझमान यांचे मार्गदर्शन लाभले. त्यानंतर काही काळ त्यांनी इंग्लंडमध्येही काम केले. १९३२ साली ते भारतात परत आले. परत आल्यावर त्यांनी बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे उपकार्यवाहक पद स्वीकारले. नंतर ते या संस्थेचे अध्यक्षही बनले. बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या माध्यमातून त्यांनी हैदराबाद पक्षी निरीक्षण, त्रावणकोर - कोचीन पक्षी सर्व्हेक्षण, अफगाणिस्तान पक्षी सर्व्हेक्षण, कैलास पक्षी निरीक्षण यात्रा अशा मोहिमा राबवल्या. डॉ. सलीम अली यांनी सुगरण पक्षाच्या वर्तनावर बारकाईने अभ्यास केला व त्यावर बिएनएचएस जर्नलमध्ये एक शोधनिबंध लिहिला. या शोध निबंधाने त्यांना पक्षी शास्त्रज्ञ म्हणून मान्यता मिळवून दिली.

डॉ. सलीम अली यांनी भारतभर फिरून विविध पक्षांची तपशीलवार माहिती गोळा केली.ती माहिती त्यांनी सर्वसामान्य नागरिकांना समजावी यासाठी पुस्तक रुपात लिहिली. त्यांनी लिहिलेल्या हँडबुक ऑफ इंडिया अँड पाकिस्तान व पिक्टोरियल गाईड या दहा खंडीय पुस्तकाने त्यांचे जगभर नाव झाले. डॉ. डीलन रीलपे यांच्या साथीत त्यांनी अपार मेहनत घेऊन भारतीय पक्षांच्या बाराशे जाती, २१०० उपजातींच्या नोंदी, सवयी, शास्त्रशुद्ध सर्वांगीण माहिती चित्रांसहित एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिली. डॉ. सलीम अली यांच्या ह्याच कार्याने भारतात हौशी पक्षी निरीक्षक बनण्याची परंपरा निर्माण झाली. भारतातील पक्षी निरीक्षक डॉ. सलीम अली यांना आद्य गुरू मानतात. त्यांच्या कार्याची नोंद घेऊन भारत सरकारने त्यांना पद्मभूषण पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला तसेच त्यांचा जन्मदिन पक्षीदिन म्हणून साजरा करण्यात येतो. डॉ. सलीम अली यांचे २० जून १९८७ रोजी निधन झाले. डॉ. सलीम अली यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# वाळू तस्करांनी ढाबा पेटवला



**अमरावती :** आमच्या वाळूच्या वाहनांबाबत तूच प्रशासनाला माहिती देतो, त्यामुळे आमच्यावर कारवाई केली, वाहने जप्त करून गुन्हे दाखल केले, असा आरोप करून पाच जणांनी धारणी ते अकोट मार्गावरील बिजूधावडी येथील ढाबा मालकावर जीवघेणा हल्ला चढवला. तसेच त्यांनी ढाब्यावरील शेकडो खुर्च्या, कार, रोख रकमेसह संपूर्ण ढाबा पेट्रोल टाकून पेटवून दिला. ही घटना सोमवारी (दि. १६) रात्री १० वाजता घडली. या प्रकरणी धारणी पोलिसांनी मंगळवारी रात्री चौघांना अटक केली.

श्रीकांत बाबुलाल जयस्वाल (३८, रा. बिजूधावडी) असे तक्रारदार ढाबा मालकाचे नाव असून, या प्रकरणात पोलिसांनी राजा ऊर्फ क्रिष्णा बाबू पाटील (२९), गज्या ऊर्फ दिलीप बाबू पाटील (३३), गणेश बाबू पाटील (२८) आणि उत्तम बलदेव पाटील (२५, सर्व रा. गडगा मालू, ता. धारणी) यांना अटक केली आहे. श्रीकांत जयस्वाल यांचा बिजूधावडी येथे ढाबा असून, ते तेथेच राहतात. सोमवारी रात्री १० च्या सुमारास सध्या अटकेत असलेल्या चौघांसह पाचजण ढाब्यावर गेले व त्यांनी पेट्रोल ओतून ढाबा पेटवला. यात ढाब्यावरील साहित्य, कार व दोन मांजरी जळाल्या. त्यानंतर श्रीकांत यांनी धारणी पोलिसांत तक्रार दिली. या जाळपोळीत सुमारे २५ लाखांचे नुकसान झाले, असे जयस्वाल यांनी नमुद केले आहे.

# तीन महिन्यांचे रेशन वाटप सुरू

**■ महासागर प्रतिनिधी, नांदगाव खंडेश्वर, दि. १९ :**
पावसाळा अगदी जवळच आला असताना नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील नागरिकांसाठी पुरवठा विभागाने पूरबाधित गावांना प्राधान्याने तीन महिन्यांचे रेशन वाटप सुरू केले आहे. त्यामुळे रेशनधारकांना दिलासा मिळाला आहे. शासनाच्या निर्देशानुसार जून, जुलै आणि ऑगस्ट या तीन महिन्यांचे रेशन एकत्रितपणे जून महिन्यातच देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानांमध्ये धान्य पोहोचवण्याचे आणि वाटपाचे काम सुरू करण्यात आले आहे.



पुरामुळे दरवर्षी बाधित होणाऱ्या गावांमध्ये रेशन पुरवठा वेळेवर व्हावा, यासाठी शासनाकडून ही विशेष योजना राबवली जात आहे. नांदगाव खंडेश्वर तालुक्यात एकूण १५६ गावे नदीकाठावर आहेत. त्यातील ३० ते ३५ गावे दरवर्षी पूरस्थितीचा सामना करतात. अशा वेळी रस्ते बंद होऊन मुख्यालयाशी संपर्क तुटतो. त्यामुळे नागरिकांना आठवडाभर गावातच अडकून पडावे लागते. धान्याचा तुटवडा भासू नये म्हणून तीन महिन्यांचे रेशन आगाऊ देण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. या योजनेनुसार सर्वप्रथम पूरप्रवण गावांमध्ये रेशन पोहोचवले जात आहे.

अनेक गावांमध्ये आधीच धान्य पोहोचवले गेले असून काही ठिकाणी रेशन वाटपाची प्रक्रियाही सुरू झाली आहे. लाभार्थ्यांनी आपले तीन महिन्यांचे रेशन ३० जूनच्या आत घेऊन जावे. मुदतीनंतर रेशन मिळणार नाही. पुढील आपत्तीपासून स्वतःची व कुटुंबाची सुरक्षितता सुनिश्चित करावी. तसेच योग्य ती खबदारी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# तूर, कपाशी, सोयाबीन लागवडीसाठी शेतीची कामे पूर्ण

**■ महासागर प्रतिनिधी, नांदगाव खंडेश्वर, दि. १९ :**

तालुक्यातील शेतकऱ्यांनी पेरणीपूर्व मशागतीची कामे पूर्ण झाली आहे. आता तालुक्यांतील शेतकरी पावसाच्या प्रतिक्षेत आहेत. शेतांमध्ये रोटावेटर व ट्रॅक्टरच्या सहाय्याने बेड मेकरने बेड पाडून लागवडीसाठी जमिनी पूर्णतः तयारी करण्यात आलेल्या आहेत. कापूस लागवडीसाठीही सऱ्या तयार करून ठेवण्यात आल्या आहेत. पाऊस सुरु झाला की तत्काळ तूर, कपाशी व सोयाबीन पिकांची पेरणी केली जाणार आहे. मागील वर्षी अतिवृष्टीमुळे तुरीचे पीक जळाल्याने यावर्षी शेतकऱ्यांनी नवे धोरण स्वीकारले आहे. त्यांनी बेडवर तूर लागवड करण्याचा निर्णय घेतला. अतिवृष्टीमुळे तुरीचे नुकसान होणार नाही, असा विश्वास शेतकऱ्यांना वाटतो आहे. यावर्षी सोयाबीनच्या मागील वर्षीच्या कमी दरामुळे काही शेतकऱ्यांनी कपाशी लागवडीकडे कल दर्शवला आहे. कपाशी



लागवडीसाठी खुरपणीचा खर्च जास्त असल्याने राउंडअप सहनशील बीटी कपाशी पेरण्याचा निर्णय घेतला आहे. बीटी कपाशीला शासन मान्यता प्राप्त नसल्याने ती बाजारात बेकायदेशीरपणे विकली जात आहे. अधिक पैसे मोजून शेतकरी ही बियाणे विकत घेत आहेत. त्याची चोरुन लागवड केली जात आहे. कपाशीकडे वाढला शेतकऱ्यांचा कल अजित ५ हे लवकर येणारे कपाशीचे वाण असल्याने त्यालाही शेतकऱ्यांनी पेरणीला प्राधान्य दिले आहे. मात्र, बाजारात हे बियाणे उपलब्ध नसल्याने त्याच्या एमआरपीपेक्षा अधिक दराने खरेदी करावी लागत आहे. त्यामुळे बाजारात मोठ्या प्रमाणावर काळाबाजार सुरु झालेला आहे.

# वायुसेना अधिकारी श्रीराम क्षीरसागर यांचा सत्कार



**उमरखेड :** 'वायुसेनेत स्वतःच्या परिश्रमाने सहभागी होऊन श्रीराम क्षीरसागर यांनी बाळगलेले देशसेवेचे ध्येय खरोखरच वाखाणण्याजोगे आहे. त्यासाठी संधी मिळवलेल्या तालुक्यातील पोफाळी येथील श्रीराम क्षीरसागर यांनी खऱ्या अर्थाने जिल्ह्याची मान उंचावली आहे,' असे प्रतिपादन आमदार किसन वानखेडे यांनी केले. श्रीराम क्षीरसागर या २२ वर्षीय वायुसेना अधिकाऱ्याचा गावकऱ्यांच्या वतीने पोफाळी येथील गजानन महाराज संस्थानच्या प्रांगणात नागरी सत्कार करण्यात आला. त्यावेळी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. या वेळी माजी आमदार प्रकाश देवसरकर, तातू देशमुख, राम देवसरकर, क्रिष्णा देवसरकर, महेश काळेश्वरकर, नानाभाऊ गाडबैले, ॲड. संतोष जैन, ॲड. बाळासाहेब नाईक, इनायतउल्ला जनाब, रमेश चव्हाण, देविदास खोकले, दत्तराव शिंदे, सुचिता पाटेकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. आमदार वानखेडे म्हणाले की, वायुसेनेच्या सतर्कतेमुळे देश सुरक्षित आहे. अशा सेवेत या तालुक्यातील श्रीराम क्षीरसागर हे सेवा देण्यासाठी सज्ज झाल्याने उमरखेडची मान उंचावली आहे, असे सांगून अवघ्या २२ वर्षीय श्रीराम क्षीरसागर यांनी आई वडिलांचेही स्वप्न पूर्ण केल्याचे त्यांनी शेवटी सांगितले. या वेळी राम देवसरकर यांनी तालुक्यातील सर्व विद्यार्थ्यांनी या श्रीराम क्षीरसागर यांचा आदर्श घेऊन वाटचाल करावी तसेच पोफाळी ग्रामपंचायतीने घेतलेला जि. प. प्राथमिक शाळेत प्रवेशात कर माफ हा निश्चितच प्रेरणादायी असून, शासनाला हातभार लावणारा असल्याचे सांगितले. या वेळी प्रकाश देवसरकर, तातु देशमुख, गजानन शिंदे यांनी मनोगतातून श्रीराम क्षीरसागर या वायुसेना अधिकाऱ्याला शुभेच्छा दिल्या. संचालन सतीष नाईक यांनी केले तर प्रशांत गुंढारे यांनी आभार मानले.

# विदर्भ कृषी सेवा केंद्रात कृषी विभागाची धाड अजित १५५ चा अवैध साठा आढळला

## परवाना रद्द करण्याचा प्रस्ताव

**■ महासागर प्रतिनिधी, दर्यापूर , दि. १९ :**

येथील विदर्भ कृषी सेवा केंद्रात जास्त मागणी असलेल्या अजित १५५ या कापसाच्या वाणाची अवैध साठवणूक केला जात असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.



कृषी विभागाच्या भरारी पथकाने धाड टाकून हा संपूर्ण प्रकार बुधवारी (ता.१८) उघडकीस आणला. याप्रकरणी संबंधित कृषी केंद्र चालकाचा परवाना रद्द करण्याचा प्रस्ताव

कृषी विभागाकडून पाठवण्यात आल्याची माहिती आहे.

येथील विदर्भ कृषी सेवा केंद्रात अजित १५५ या कापसाच्या वाणाची मोठ्या प्रमाणात साठवणूक केली जात असल्याची माहिती कृषी विभागाच्या हाती आली होती. कृषी विभागाकडून माहितीची शहानिशा करण्यात आली दरम्यान संबंधित कृषी केंद्राकडून अजित १५५ या कापसाच्या वाणाची साठवणूक करून कृत्रिम तुटवडा निर्माण केला जात असल्याची बाबही कृषी विभागाच्या निदर्शनास आली होती. त्यानंतर तालुका कृषी अधिकारी आरती साबळे, पंचायत समितीचे कृषी अधिकारी रामाकडे यांच्या पथकातील संतोष राणे, प्रशांत हाडोळे, आनंद गावंडे यांनी संबंधित कृषी केंद्रावर धाड टाकत अजित १५५ च्या बॅग जप्त केल्या.

कृषी विभागाने चौकशी केली असता संबंधित दुकानदाराकडून उडवा उडवीची उत्तरे देण्यात आल्याने कृषी विभागाने आढळून आलेला साठा हा शेतकऱ्यांना वितरित केला. तसेच संबंधित कृषी केंद्राचा परवाना रद्द करण्याचा प्रस्ताव देखील कृषी विभागाकडून वरिष्ठांना पाठवला जाणार असल्याची माहिती आहे.

# राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या अमरावती जिल्हा अध्यक्षपदी अंकुश घारड यांची निवड

**■ महासागर प्रतिनिधी, मोर्शी , दि. १९ :** मोर्शी येथील अंकुश घारड यांची राष्ट्रवादी युवक काँग्रेस अजित पवार गटाच्या अमरावती जिल्हा ग्रामीणच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. मोर्शी शहरातील सामाजिक कार्यकर्ते अंकुश घारड यांची राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या जिल्हाध्यक्ष पदी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार , प्रांत अध्यक्ष सुनील तटकरे , युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, माजी आमदार देवेंद्र भुयार, आमदार संजय खोडके, आमदार सुलभा खोडके, सुरेखा ठाकरे, जिल्हाध्यक्ष संतोष महात्मे, विदर्भ अध्यक्ष निखिल ठाकरे यांनी निवड केली, अंकुश घारड यांची सुरवात मोर्शी शहराध्यक्ष म्हणून झाली आणि आता अमरावती जिल्हाध्यक्ष पद हे त्यांना पक्षाने कामाची दखल घेऊन दिले आहे. मोर्शी तालुक्यातील सर्वसामान्य कुटुंबातील युवकाला अमरावती जिल्हा अध्यक्ष पदाची एवढी मोठी जबाबदारी अंकुश घारड यांना मिळाल्यामुळे मोर्शी वरूड तालुक्यातील युवक राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये नवचैतन्याचे वातावरण निर्माण झालेले आहे. प्रामाणिकपणे आणि निष्ठेने काम केल्यावर त्याचे फळ नक्की मिळते यावर आपला विश्वास असल्याने राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या अमरावती जिल्हा अध्यक्षपदाची जबाबदारी उपमुख्यमंत्री अजित दादा पवार व सर्व नेत्यांच्या विश्वासाला सार्थ ठरवुन पार पाडणार




असल्याचे अंकुश घारड यांनी सांगितले. गेल्या अनेक वर्षांपासून युवकांचे प्रश्न सोडविण्यासाठी आंदोलनाच्या माध्यमातून आवाज उठवून युवकांना न्याय मिळवून देणारे, प्रचंड संघर्षातून उभे राहून आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर नेतृत्व सिद्ध करणारे अंकुश घारड यांना महाराष्ट्रातील अनेक नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून शुभेच्छा दिल्या आहेत. अंकुश घारड यांची काम करण्याची जिद्द आणि चिकाटी पाहिली की राष्ट्रवादी युवक काँग्रेसची एक मजबूत युनिट उभे राहून राष्ट्रवादी पक्ष उंच भरारी घेईल असा विश्वास सर्वसामान्य जनतेतून व्यक्त केला जात असून यांच्यावर सर्व स्तरातुन अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# जिल्ह्यात शाळा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा



**■ महासागर प्रतिनिधी, वर्धा,दि.१९:** शैक्षणिक वर्ष २०२५-२६ ची सुरुवात २३ जूनपासून होत असून, या दिवशी वर्धा जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये 'शाळा प्रवेशोत्सव' मोठ्या उत्साहात साजरा करण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे. शाळांमधील विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढवणे, शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करणे या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. विदर्भात राज्य मंडळाच्या शाळा २३ जून पासून सुरू होत आहे. या निमित्ताने १०० शाळांना भेटी देणे उपक्रमांतर्गत पालकमंत्री, खासदार, आमदार तसेच अधिकारी शाळांमध्ये उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे स्वागत करतील. ठचला शाळेत जाऊयाठ या घोषवाक्यासह फलक, पालखी, सजवाट, रांगोळी आणि पारंपरिक स्वागताच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत केले जाणार आहे. शाळेच्या पहिल्या दिवशी लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकारी विविध शाळांना भेट देतील. विद्यार्थ्यांना पुस्तके व गणवेश वाटप इयत्ता १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना सर्व विषयांची पुस्तके मोफत दिली जाणार आहेत.

वर्धा जिल्ह्यात ८० हजार ६५६ विद्यार्थ्यांना एकूण ४ लाख ७९ हजार ६५ पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात येणार आहे. तसेच ४६ हजार ७४७ विद्यार्थ्यांना प्रत्येकी एक गणवेश आणि एक जोडी बूट-पायमोजे देण्यात येणार आहेत. शालेय पोषण आहारांतर्गत पौष्टिक आहार व गोड पदार्थ वाटप केले जाईल.

मुख्याध्यापकांना शुभेच्छा संदेश राज्यातील सर्व मुख्यध्यापकांना त्यांच्या मोबाईल क्रमांकावरून एसएमएसद्वारे शुभेच्छा संदेश मिळाला आहे.

यासोबतच मुलांना भेट देर्णाऱ्या मान्यवरांना राज्य शासनाच्या विविध शैक्षणिक योजनांची माहिती असलेले एक घडीपत्रक वितरित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी जिल्हा व तालुका स्तरावरील अधिकाऱ्यांनी शाळा भेटीचे नियोजन केले आहे.


**Change Of Name**

MY OLD NAME WAS **ASHFAQUE ALIMUDDIN SHAIKH.** NOW MY NEW NAME IS **ASHFAQUE ALIMUDDIN SHEIKH.**
**ADD :** P.N.211 JAI HIND NAGAR SADIQABAD ROAD, MANKAPUR, NAGPUR - 440030

MY OLD NAME WAS **DINESH KUMAR ISRANI.** NOW MY NEW NAME IS **DINESH BODARAM ISRANI.**
**ADD :** 9 MEERA KUNJ KUSHI NAGAR JARIPATKA NAGPUR.

MY OLD NAME WAS **DHAMANGOANWALA KHUTEJA.** NOW MY NEW NAME IS **KHADIJA YUSUF DHAMANGAONWALA.**
**ADD :** FLAT NO.405, BHANDARA ROAD, MSB INSTITUTION, WARDHAMAN NAGAR, NAGPUR - 440008.

MY OLD NAME WAS **ABDUL GANI ABDUL SATTAR POUCHATOD.** NOW MY NEW NAME IS **ABDUL GANI ABDUL SATTAR SHEIKH.**
**ADD :** RAMALESHWAR WARD , AT POST RAMTEK , NAGPUR 441106


# वाढीव कर्जाचा लाभ घेण्यासाठी जून्या कर्जाची परतफेड कराजिल्हाधिकारी वान्मथी सी.

**■ महासागर प्रतिनिधी, वर्धा,दि.१९:** शेतर्कऱ्यांना दरवर्षी दिल्या जार्णाऱ्या पीककर्जाची विहित मुदतीत परतफेड करणे आवश्यक आहे. परतफेड न झाल्यास शेतर्कऱ्यांना पुढील वर्षी कर्ज उपलब्ध होण्यास अडचणी निर्माण होण्यासोबतच कर्जावरील व्याज सवलत योजनेचा लाभ मिळत नाही. त्यामुळे शेतर्क?यांनी पीक कर्ज वेळेवर नुतनीकरण करावे व वाढीव पीक कर्जासह व्याज सवलत योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी केले आहे. जिल्ह्यातील विविध बँकांमार्फत दरवर्षी पीककर्जाचे वितरण केले जाते. या अल्पमुदत पीककर्जाची परतफेड विहित मुदतीत म्हणजे कर्ज घेतल्यापासून ३६५ दिवस किंवा ३० जून पूर्वी करावी लागते. या मुदतीत कर्जफेड करर्णाऱ्या शेतर्कऱ्यांना नवीन वर्षासाठी पुन्हा कर्ज दिले जाते. मुदतीत परतफेड न केल्यास कर्ज खाते थकीत होते. अशा थकीत खातेधारकांना बँका पीककर्ज



देत नाही. त्यामुळे शेतर्क?यांना अडचणींचा सामना करावा लागतो. खाते नुतनीकरण करुन घेतल्यास नवीन पीककर्जाच्या दरानुसार वाढीव कर्ज घेण्यास शेतकरी पात्र होतात. विहित मुदतीत कर्ज परतफेड केल्यास डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेचा लाभ उपलब्ध होतो. या योजनेंतर्गत ३ लाखांपर्यंतचे कर्ज शून्य टक्के व्याजदरावर शेतर्क?यांना उपलब्ध होते. कर्जखाते नुतनीकरण केलेल्या शेतर्क?यांना बँकांच्या इतर कर्ज योजनांचा देखील लाभ घेता येतो. त्यात कृषी वाहन योजना, शेती तारण योजना, फळबाग, फुलबाग, हरितगृह, शेडनेट योजना,

**३० जूनपर्यंत कर्ज खाते नुतनीकरणास संधी**

**थकीत भरल्यास विविध सवलतींचा मिळणार लाभ**

शेळीपालन, पशुपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, कृषि यांत्रिकीकरण, प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया आदी योजनेचा लाभ शेतर्कऱ्यांना घेता येतो. वर्षनिहाय नुतनीकरण झालेले खाते सन २०१७-१८ मध्ये पीक कर्ज नुतनीकरण झालेल्या खात्यांची संख्या १३ हजार ४९२ होती. सन २०१८-१९मध्ये ९ हजार १४७, सन २०१९-२०मध्ये १४ हजार ७७२,

सन २०२०-२१मध्ये १३ हजार ३७५, सन २०२१-२२मध्ये ३८ हजार २९९, सन २०२२-२३मध्ये ४३ हजार ७६, सन २०२३-२४मध्ये ५० हजार ८४१ व सन २०२४-२५ मध्ये २९ हजार ७६७शेतर्क?यांनी पीक कर्ज खाते नुतनीकरण केले आहे.

# गांजा विक्रेत्याविरुध्द गुन्हे शाखेची धडक कारवाई

**वर्धा,दि.१९प्रतिनिधी.** गांजा विक्रेत्यांविरुध्द स्थानिक गुन्हे शाखा पथकाने धडक कारवाई करीत दोन गुन्ह्यात २लाख ३६हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. अमली पदार्थ बाळगणारे व विक्री करणारे यांच्यावर कडक कारवाई करण्याचे आदेश असल्याने स्था.गु.शा. वर्धा यांना मिळालेल्या गोपणीय माहितीवरून शिवनगर ते हमदापुर रोडवर सापळा रचुन एन.डि.पी.एस. ॲक्ट अंतर्गत कार्यवाही केली असता, आरोपी हरिष व्यंकट मोहिते, रा. शिवनगर तह. सेलु, यास पोलीसांची चाहुल लागताचं, त्याने त्याचे ताब्यातील मोटर सायकल जागीच सोडुन पसार झाला. त्याचा साथीदार मनीष गणेश मोहिते वय (३०) रा. शिवनगर तह. सेलु यास ताब्यात घेवुन, त्याची व मोटर सायकलची झडती घेतली असता, झडती दरम्यान एका कापडी पिशवीमध्ये निव्वळ १ किलो ६२ ग्रॅम वजनाचा गांजा अंमली पदार्थ कि. २१हजार२४० रू.व एपी-३०एए-५८९९क्रमांकाची मोटर सायकल कि. २लाख रु असा २ लाख२४० रू चा मुद्देमाल जप्त करून, दोन्ही आरोपींविरूध्द विविध कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन, जप्त मुद्देमाल व आरोपीस पो.स्टे. दहेगाव यांचे स्वाधीन करण्यात आले आहेत. तसेच शहर हद्दीत स्था.गु.शा. वर्धा येथे सिद्धार्थ नगर वर्धा येथे राहणारा अमित ऊर्फ जॉन हरिभाऊ उके याचे राहते घरी गांजा बाबत रेड केला असता त्याचे घर झडतीमध्ये ७५८ ग्राम गांजा की. १५हजार १६०रु. चा मिळुन आल्याने आरोपी विरुद्ध पोलिस स्टेशन वर्धा शहर येथे गुन्हा नोंद करण्यात आला.


**चौकशीची जाहीर नोटीस**

जा.क्र / न्याय/८४१/२०२५

पत्ता:-सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय वर्धा
राजेश नरहर शेट्टीवार यांची इमारत,
दुसरा माळा, हिरो शोरूमच्या मागे,
मोहन नगर, नागपुर रोड, वर्धा

अर्ज क्रमांक ७७/२०२७/कलम-१९
अर्जदार :- श्री योगेश नंदुजी बोबडे
सार्वजनिक व्यासाचे नांव व नोदंणी कमांक - श्री हनुमान सार्वजनिक देवस्थान समिती बाभुळभाव बो.ता. देवळी जि. वर्धा बाबत

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, धर्मादाय उपआयुक्त / सहायक धर्मादाय आयुक्त, वर्धा विभाग वर्धा हे वर नमूद केलेल्या नोंदणी अर्ज यासंबधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत -

(१) वर जमुद केलेला न्यास अस्तिवात आहे काय ? आणी सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दीष्ठ केलेली मिळकत सदर व्यासाच्या मालकिची आहे काय ?
(अ) जंगम मिळकत : ११000/- रू अध्यक्ष यांच्याकडे जमा आहे.
(ब) स्थावर मिळकत : (वर्णन) ----- निरंक ----

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफीयत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून ३० दिवसाचे आत या कार्यालयावे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे, नंतर आलेल्या कैफीयतीचा विचार केला जाणार नाही, तसेच वरील मुदतीत कैफीयत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पूर्ण केली जाईल व नोंदणी अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

हि नोटीस माझे सहीनिशी व मा. सहायक धर्मादाय आयुक्त, वर्धा यांचे शिक्यानिशी आज दिनांक १६/०६/२०२५ रोजी दिली

अधिक्षक
(व्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोदंणी कार्यालय,
वर्धा विभाग वर्धा


# स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतरही हेटी गावचा रस्ता दुर्लक्षित

**आष्टी(श),दि.१९प्रतिनिधी.** सुसुंद्रा तालुका कारंजा (घाडगे) जिल्हा वर्धा गावाच्या पुढे सुसुंद्रा हेटी हे अंदाजे १५० ते २०० लोकसंख्येचे आदिवासी खेडे गाव आहे. एकमेव रस्ता त्या गावांमध्ये जाण्या-येण्याकरिता असून याच रस्त्याने सदर गावातील जवळपास २५ ते ३० विद्यार्थी जिल्हा परिषद शाळा सुसुंद्रा व संत भाकरे महाराज विद्यालय सुसुंद्रा येथे शिकण्याकरिता येतात. पावसाळ्यातील चार महिन्याच्या कालावधीत फक्त दोनच महिने हे विद्यार्थी शाळेत येऊ शकतात. मरणोपरांतही इथला संघर्ष संपत नाही.यापूर्वी अनेक निवेदने देऊन



कुठलेही राज्यकर्त्यांना हा पूल आणि पक्का रस्ता व्हावा अशी सुबुद्धी सुचली नाही हीच खरी शोकांतिका आहे. स्वातंत्र्याच्या ७५ वर्षाच्या इतिहासात हेटी गावातील रस्ता दुर्लक्षित असावा हा चिंतनाचा विषय ठरु पहात आहे जिल्हा परिषद शाळा सुसुंद्रा व संत भाकरे महाराज विद्यालय सुसुंद्रा येथे हेटी गावातील विद्यार्थी शिकण्याकरिता येतात.पावसाळ्याच्या दिवसात शाळेतून परतीच्या वेळेला जर आभाळ किंवा पाऊस आला तर विद्यार्थ्यांना नाल्याचा पूर उतरेपर्यंत तीन-चार तास कधी कधी दिवसभर पूर उतरेपर्यंत सुसुंद्रा येथे थांबावे लागते. मुले घरी येईपर्यंत पालकांच्या जीवात जीव नसतो. त्यांचे सतत शाळेतील शिक्षकाशी संपर्क सुरू असते. तसेच सुसुंद्रा या गावाची स्मशानभूमी याच हेटी रोडवर आहे. पावसाळ्यात अंत्यविधी करताना सर्वांना जीव मुठीत घेऊन रस्ता पार करावा लागतो. या दिवसांमध्ये कुणी आपल्या अंतिम प्रवासाला जाऊच नये असे येथील लोकांना मनोमन वाटते.येथील ग्रामस्थांनी गावात रस्ता होईल ही आशाच सोडली आहे. विद्यार्थ्यांच्या होर्णाऱ्या शैक्षणिक नुकसानीला जबाबदार कोण, शेकडो हेक्टर शेती याच मार्गाने असल्याने शेतर्कऱ्यांना मोठा गंभीर प्रश्न असून, जगण्याकरिता आवश्यक असणारे किराणा इतर वस्तू आणणे कठीण झाले आहे.


महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

**भु. औ. वि. कें.**
**ई-निविदा सूचना क्र. ७१ /०२४-२५**

भुसावळ औष्णिक विद्युत केंद्राकडून खालील पुरवठा / कामांसाठी ऑनलाईन निविदा मागविल्या जात आहेत.

| अनु. क्र. | निविदा क्र. / विभाग | निविदा तपशील | निविदेची अंदाजित किंमत / बयाना रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| १. | ३०००05८७०३ / कोळसा हाताळणी विभाग २x५०० मे.वॅ. | भु.औ.वि.केंद्र दीपनगर येथील कोळसा हाताळणी विभाग २x५०० मेगावॅटमध्ये डस्ट कंटेनमेंट सिस्टम पुरवण्यासाठी आणि बसवण्यासाठी कामाचा करार. | रु.१,९५,७९,५६०/- / रु. १,९९,३००/- |
| २. | ३००००५८४२९ / कोळसा हाताळणी विभाग | भु.औ.वि.केंद्र दीपनगर येथील कोळसा हाताळणी विभाग येथे १४० मेट्रिक टन क्षमतेच्या इन मोशन वेईंग सिस्टमचे डिझाइन, अभियांत्रिकी, उभारणी आणि कार्यान्वित करण्याच्या कामाचा करार. | रु.८७,८०,०००/- / रु. ९१,३००/- |
| ३. | ३००००५८५६८ / कोळसा हाताळणी विभाग १ x ६६०मे.वॅ. | भु.औ.वि.केंद्र दीपनगर येथे १x६६० मेगावॅट क्षमतेच्या कोळसा हाताळणी विभागा साठी आवश्यकतेनुसार बंकर पॉकिंग, स्क्रॅपिंग आणि ताडपत्री घालण्याचे कामाचे कंत्राट. | रु. ६५,२८,४२२ /- / रु. ६८,८०० /- |

निविदा खर्च १ ,१८०/ - (जीएसटी सहित) आहे. अधिक माहितीसाठी कृपया भेट द्या. https://eprocurement.mahagenco.in/.

मुख्य अभियंता (सं.आणि सु.), भु. औ. वि. कें., दीपनगर.

## रॉयल स्टॅग बॅरल सिलेक्ट शॉर्ट्र्सने नवीन मोहीमेची सुरुवात केली जी आहे फॉर दि सिलेक्ट वन्स




**मुंबई, १९ जून :** भारतातील सर्वोत्तम लघुपट कथाकथनासाठी समीक्षकांनी प्रशंसित केलेले व्यासपीठ, रॉयल स्टॅग बॅरल सिलेक्ट शॉर्ट्र्सने त्यांची नवीन संकल्पनात्मक मोहीम, फॉर द सिलेक्ट वन्सचे, सादरीकरण केले, ज्यामध्ये प्रसिद्ध कलाकार राजकुमार राव आणि पत्रलेखा यांचा सहभाग आहे. एफसीबी एनईओ ची संकल्पना असलेलीही मोहीम अशा लोकांना समर्पित आहे जे यशाच्या प्रवासात, सातत्याने विचारपूर्वक निवडकरत असतात – त्यांच्या मूल्यांशी आणि आकांक्षांशी प्रामाणिक राहून बदल आणि ज्ञानासाठी प्रयत्न करतात.
ब्रँडच्या यशाच्या तत्वज्ञानावर आधारित, ही मोहीमेची फिल्म एक सांस्कृतिक आणि कलात्मक प्रदर्शन आहे – जे रॉयल स्टॅग बॅरल सिलेक्ट शॉर्ट्र्सच्या मूळ, उद्देशपूर्ण आणि विशिष्ट कथांप्रती असलेल्या वचनबद्धतेला पुन्हा बळती देतो.
पर्नोड रिकार्ड इंडियाचे मुख्य विपणन अधिकारी कार्तीक मोहिंद्रा म्हणाले: रॉयल स्टॅग बॅरल सिलेक्ट शॉर्ट्र्सने एक अशी व्यवस्था तयार केली आहे ज्यामुळे जिज्ञासू आणि विवेकी प्रेक्षकांपर्यंत जागतिक दर्जाच्या कथा पोहोचतात, आणि त्यामुळेच ते भारतामधील लघुपटांसाठीचे एक ठिकाण बनले आहे. आमच्या नवीन संकल्पनात्मकमोहिम, फॉर द सिलेक्ट वन्ससह, आम्ही आमच्या ब्रँडच्या निवडक कथाकथन प्रवासाचा हा पुढील भाग सुरू ठेवत आहोत, जो त्यांच्या निवडींच्या माध्यमातून यशाचे साजरीकरण करतो.
सीसीओ, एफसीबी एनईओ मयुरेश दुभाषी म्हणाले, ही फिल्म चांगल्या प्रकारे निवड करण्याच्या कलेला समर्पित आहे. भरपूर पर्याय असलेल्या जगात, आपण काय नाकारतो आणि काय स्वीकारतो यावरून आपली खरी ओळख निर्माण होते. राजकुमार राव आणि पत्रलेखा यांच्यासोबत ही कथा तयार करण्याची प्रक्रियेमध्ये सूक्ष्म, अंतर्गत प्रवासाला टिपल्या गेले, जिथे प्रत्येक निवड म्हणजे अगदी प्रामाणिकपणे केलेली होती. ही प्रक्रिया रॉयल स्टॅग बॅरल सिलेक्ट शॉर्ट्र्सच्या बदलत्या आणि निर्भय दृष्टीने व्यक्तींना सन्मानित करण्याच्या विचारांना जुळते.
'फॉर द सिलेक्ट वन्स'च्या केंद्रस्थानी असलेल्या विविधता आणि आकांक्षेचे प्रतिबिंब असलेली कायमस्वरूपी छाप सोडण्याच्या उद्देशाने उच्च-डेसिबल लाँचद्वारे ही मोहीम अधिक तीव्र केली जाईल.

## एअरटेलने ऑनलाइन फसवणुकीवर कडक कारवाई केली

**महाराष्ट्र आणि गोव्यात दररोज २ लाख ग्राहकांना संरक्षण दिले**

**नागपूर, १९ जून :** भारती एअरटेल (एअरटेल) ने महाराष्ट्र आणि गोव्यातील ग्राहकांना वाढत्या ऑनलाइन फसवणुकींपासून संरक्षित करण्याच्या आपल्या मोहिमेत महत्त्वपूर्ण प्रगती जाहीर केली आहे. एआय-संचालित फसवणूक शोध प्रणालीच्या देशव्यापी अंमलबजावणीचा एक भाग म्हणून, एअरटेलने त्यांची प्रगत फसवणूक शोध प्रणाली लाँच केल्यानंतर अवघ्या ३६ दिवसांत महाराष्ट्र आणि गोवा राज्यांमधील २ लाखांहून अधिक ग्राहकांना यशस्वीरित्या सुरक्षित केले आहे.
सर्व एअरटेल मोबाईल आणि ब्रॉडबँड ग्राहकांसाठी स्वयंचलितपणे सक्रिय केलेली ही प्रगत प्रणाली एसएमएस, व्हॉट्सअॅप, टेलिग्राम, फेसबुक, इंस्टाग्राम, ई-मेल आणि इतर ब्राउझर्समधील लिंक्स स्कॅन आणि फिल्टर करते. ही प्रणाली प्रत्यक्ष वेळेतील (रिअल-टाईम) धोका ओळखण्याची क्षमता वापरते आणि दररोज १ अब्जांहून अधिक यूआरएल तपासते. ही प्रणाली हानिकारक साइट्सवरचा प्रवेश १०० मिलीसेकंदांच्या आत अवरोधित करते.
या उपक्रमाबाबत भाष्य करताना, भारती एअरटेलचे महाराष्ट्र आणि गोवा विभागाचे मुख्य कार्यकारी अधिकारी जॉर्ज मॅथन म्हणाले, एअरटेलमध्ये आमची मुख्य बांधिलकी ग्राहकांना सर्व प्रकारच्या फसवणुकींपासून संरक्षण देण्याची आहे. आमच्या नेटवर्कची एआय-आधारित फसवणूक शोध प्रणालीसोबत सांगड घालून, आम्ही हे सुनिश्चित करत आहोत की आमचे ग्राहक कोणत्याही नव्याने उद्भवणाऱ्या धोकेपासून कोणतीही अतिरिक्त मेहनत न करता सुरक्षित राहतील. आजच पावले उचलून डिजिटल भविष्यासाठी सुरक्षा निर्माण करणे अत्यावश्यक आहे, असे आम्हाला वाटते आणि महाराष्ट्र आणि गोव्यातील आमच्या ग्राहकांसाठी सर्वसमावेशक आणि अधिक सुरक्षित नेटवर्क उपलब्ध करून देणारे आघाडीचे कंपनी म्हणून आम्हाला अभिमान वाटतो.
महाराष्ट्र आणि गोवा हे भारतातील सर्वात डिजिटलदृष्ट्या प्रगत राज्यांपैकी एक मानले जात असल्याने, ऑनलाइन फसवणुकीचा धोका आता शहरी तसेच ग्रामीण भागात झपाट्याने वाढत आहे. फसवणूक करणारे आता फिशिंग लिंक्स, बनावट डिलिव्हरी संदेश आणि खोट्या बँकिंग अलर्टद्वारे अधिकाधिक वापरकर्त्यांना लक्ष्य करत आहेत. सातारा, नाशिक, अमरावती, अहिल्यानगर, चंद्रपूर, छत्रपती संभाजीनगर आणि अकोला यांसारख्या शहरांमध्ये तसेच जामगाव, घोटी, सुलतानपूर, टिपेश्वर यांसारख्या दुर्गम गावांमध्ये अशा फसवणुकीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. एअरटेलचे हे समाधान संपूर्ण राज्यासाठी एक डिजिटल सुरक्षा कवच म्हणून काम करते, जे कुटुंबे, ज्येष्ठ नागरिक, गृहिणी, विद्यार्थी आणि पहिल्यांदाच स्मार्टफोन वापरणाऱ्यांना समान पद्धतीने सुरक्षित ठेवते.

## आज का अंदाज

**शुक्रवार २० जून २०२५**

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४ | ५ | ८ | ४ | ७ | ८ | ९ |
| १४६ | १४९ | १६८ | १७० | १५८ | १७९ | ११६ | १८० |
| ४७० | २५७ | २६७ | ३६९ | ३३८ | २५० | २२४ | ३७९ |
| २९० | ३५६ | ७८० | २६० | २२० | ३५९ | ३५० | २७० |
| १० | ४० | ५३ | ८३ | ४३ | ७३ | ८१ | ९१ |
| १९ | ४९ | ५६ | ८६ | ४० | ७० | ८२ | ९२ |
| १७ | ४७ | ५२ | ८२ | ४६ | ७६ | ८५ | ९५ |

**२० जून : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| ३१ | ६१ | ९४ | ०४ |
| ३२ | ६२ | ९५ | ०५ |
| ३८ | ६८ | ९७ | ०७ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

**प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४**

# केबीसी ग्लोबल ही धरन इन्फ्रा सोलर नावाची उपकंपनी स्थापन करणार

**मुंबई, १९ जून :** पायाभूत सुविधा आणि ईपीसी सेवांमध्ये आघाडीचे नाव असलेल्या नाशिकस्थित केबीसी ग्लोबल लि. या कंपनीने अक्षय ऊर्जा क्षेत्रात विस्ताराचा भाग म्हणून, धरन इन्फ्रा सोलर प्रा. लि. या नवीन पूर्ण मालकीच्या उपकंपनीची स्थापना करण्याची घोषणा केली आहे.
१३ जून २०२५ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत या निर्णयाला मान्यता देण्यात आली. सौर आणि हायब्रिड ऊर्जा उपायांवर ही नवीन कंपनी लक्ष केंद्रित करेल, शाश्वतता आणि हरित तंत्रज्ञानासाठी कंपनीच्या वचनबद्धतेशी सुसंगत असेल, धरन इन्फ्रा-ईपीसी लि.कडे १०० टक्के मालकी राहील.
धरन इन्फ्रा सोलर प्रा. लि. अक्षय ऊर्जा मॉड्यूल्स, सेल्स आणि क्सेसरीजचे उत्पादन, डिझाइन, विकास, सुधारणा यासह विस्तृत श्रेणीतील क्रियाकलापांमध्ये सहभागी होईल. यामध्ये संशोधन, व्यापार, खरेदी, विक्री, घाऊक विक्री, किरकोळ विक्री, वितरण, आयात, निर्यात, असेंबलिंग, फॅब्रिकेटिंग, दुरुस्ती, देखभाल, बदल आणि सौर ऊर्जा प्रकल्प आणि हायब्रिड प्रणालींचे संचालन समाविष्ट आहे, जे सौर फोटोव्होल्टेइक तंत्रज्ञानाला इतर प्रकारच्या अक्षय ऊर्जेसह एकत्रित करतात. सौर ऊर्जा प्रकल्पांसाठी एंड-टू-एंड उपाय प्रदान करण्याचे उद्दिष्ट आहे.
कंपनी व्यवस्थापनाने सांगितले की, धरन इन्फ्रा सोलरची निर्मिती ही आमच्या विविधीकरणाच्या प्रवासात एक नैसर्गिक प्रगती आहे. अक्षय ऊर्जा आता एक पर्याय नाही तर एक गरज आहे. हा उपक्रम शाश्वत व्यवसाय वाढीसाठी नवीन मार्ग उघडताना स्वच्छ, हरित भविष्यासाठी योगदान देण्याच्या आमच्या दीर्घकालीन दृष्टिकोनाला बळकटी देतो.
पायाभूत सुविधा आणि स्वच्छ ऊर्जा क्षेत्रात एक व्यापक खेळाडू बनण्याच्या धरन इन्फ्रा-ईपीसीच्या धोरणात या नवीन उपकंपनीचा समावेश हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. जेव्हा भारत अक्षय ऊर्जेकडे संक्रमणाला गती देत आहे, ज्यामुळे बाजारपेठेत लक्षणीय संधी निर्माण होत आहेत, अशावेळी हे घडत आहे.
पायाभूत सुविधा आणि ईपीसी (अभियांत्रिकी, खरेदी आणि बांधकाम) प्रकल्पांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी आणि बाजारात आपला ब्रँड पुनर्स्थापित करण्यासाठी धोरणात्मक बदलाचा भाग म्हणून कंपनी केबीसी ग्लोबल लि.वरून धरन इन्फ्रा-ईपीसी लि. असे पुनर्ब्रँडिंग करत आहे. दरम्यान, फेब्रुवारी २०२४मध्ये, संचालक मंडळाने २६० कोटी रुपयांच्या ऑर्डर बुक आकाराच्या शेअरहोल्डर्सना १:१ बोनस शेअर्स जारी करण्यास मान्यता दिली.
केबीसी ग्लोबल लि. ही देशातील पायाभूत सुविधा आणि बांधकाम क्षेत्रातील एक प्रमुख खेळाडू आहे. ज्याचा अभियांत्रिकी, खरेदी आणि बांधकाम (ईपीसी) सेवांमध्ये वाढता पोर्टफोलिओ आहे. उच्च दर्जाच्या पायाभूत सुविधा प्रकल्प प्रदान करण्याचा इतिहास असलेली कंपनी आता अक्षय ऊर्जा विभागात आपली उपस्थिती मजबूत करत आहे.

## व्हर्च्युअल गॅलेक्सी इन्फोटेकतर्फे करोत्तर नफ्यात वाढ

**नागपूर, १९ जून :** व्हर्च्युअल गॅलेक्सी इन्फोटेक लिमिटेड या हायब्रीड एसएएएस आणि एंटरप्राइज सॉफ्टवेयर उत्पादन क्षेत्रातील आघाडीच्या कंपनीने ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या वर्षात ३२.१२ कोटी रुपयांचा स्वतंत्र निव्वळ नफा नोंदवला आहे. २०२३-२४ मधील १६.३० कोटी रुपयांच्या तुलनेत त्यात यंदा ९७.०५ टक्क्यांची वाढ झाली आहे. ऑपरेशन्समधून मिळणारे स्वतंत्र उत्पन्न आर्थिक वर्ष २४ मधील ६१.४६ कोटी रुपयांवरून ९५.४८ टक्क्यांनी वाढून २०२४-२५ मध्ये १२०.१४ कोटी रुपयांवर गेले आहे.
कंपनीचा ईबीआयटीडीए २०२४-२५ मध्ये ५५.५५ कोटी रुपयांवर गेला असून मागील वर्षातील ३०.९७ कोटी रुपयांच्या तुलनेत यंदा ७९.३७ टक्क्यांची वाढ झाली आहे. वर्षभरातील ईबीआयटीडीए मार्जिन गेल्या वर्षातील ५०.३८ टक्क्यांवरून ४६.२४ टक्क्यांवर गेले आहे.
व्हर्च्युअल गॅलेक्सी इन्फोटेकद्वारे प्रमुख बँकिंग सुविधा, आयटी सुविधा, ईआरपी अंमलबजावणी आणि कस्टमाइज्ड सॉफ्टवेयर सुविधांचा विकास तसेच आयटी सेवा बीएफएसआय, ईआरपी आणि ई- गव्हर्नन्स क्षेत्रासाठी पुरवल्या जातात. बीएफएसआय क्षेत्राचा कंपनीच्या एकूण व्यवसायात ९२ टक्के हिस्सा आहे, मात्र ईआरपी आणि ई-गर्व्हनन्स क्षेत्राकडून येणाऱ्या व्यवसायातही स्थिर वाढ होत आहे.
वर्ष २०२४-२५ मधील कंपनीच्या कामगिरीविषयी व्हर्च्युअल गॅलेक्सी इन्फोटेकचे सह-संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक सचिन पांडे म्हणाले, विविध क्षेत्रांकडून आयटी उत्पादनांना मिळत असलेल्या मागणीमुळे कंपनीचे उत्पन्न तसेच नफ्यात लक्षणीय वाढ झाली आहे. २०२४-२५ मध्ये आमचे उत्पन्न अंदाजे ९५.४८ टक्क्यांनी वाढले, तर करोत्तर नफ्यात ९७.०५ टक्क्यांची वाढ झाली आहे. बीएफएसआय क्षेत्रासाठी प्रामुख्याने तयार करण्यात आलेल्या प्रमुख बँकिंग सॉफ्टवेयर उत्पादनांमुळे ही वाढ दिसून आली आहे. त्याचबरोबर सातत्याने तयार केली जाणारी नाविन्यपूर्ण उत्पादने व या क्षेत्राच्या गरजा लक्षात घेऊन तयार केल्या जाणाऱ्या कस्टमाइज्ड सेवांमुळे हे शक्य झाले आहे. आम्हाला विश्वास आहे, की यामुळे येत्या तिमाहींमध्येही आमच्या उत्पन्नाला चालना मिळेल.
कंपनीने सायबर सेंटिनेल हे क्रांतीकारी सायबरसुरक्षा उत्पादन लाँच करत नुकताच सायबरसुरक्षा क्षेत्रात प्रवेश केला. वेगाने वाढत असलेल्या थ्रेट्सच्या समस्येसाठी हे उत्पादन लाँच करण्यात आले आहे. या उत्पादनासह कंपनीने एआय- तंत्रज्ञान व उद्योग क्षेत्रातील कौशल्याचा वापर करून सायबर धोके वाढत असल्याच्या सध्याच्या जगात डिजिटल असेट्स सुरक्षित ठेवण्याच्या कंपन्यांच्या प्रयत्नांना नवी दिशा देण्याचे ध्येय ठेवले आहे.
प्रमुख बँकिंग सुविधांवर आम्ही लक्ष केंद्रित करणार असलो, तरी उत्पादन श्रेणी सातत्याने अद्ययावत करण्यावर आणि नवनव्या सायबर थ्रेट्सवर मात करण्यासाठी सक्षम करणारी उत्पादन व सेवा उपलब्ध करण्यावरही आमचा भर असेल. ही उत्पादने आणि सुविधा बाजारपेठेत मोठ्या प्रमाणावर प्रचलित होतील आणि थेट आमच्या नफ्यामध्ये भर घालतील अशी अपेक्षा आहे, असेही पांडे म्हणाले.
कंपनीने नुकतेच स्टॉक एक्सचेंजवर दिमाखदार पर्दापण केले असून एनएसई इमर्जवर २६.७६ टक्के प्रीमियमसह नोंदणी केली.

## सॅमसंग आरअँडडी इन्स्टिट्यूट, नोएडा आणि आयआयटी मद्रास यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली



**गुरूग्राम, १९ जून :** सॅमसंग आरअँडडी इन्स्टिट्यूट, नोएडा (एसआरआय-एन)ने इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी मद्रास (आयआयटी मद्रास)सोबत सामंजस्य करार करत आपला उद्योग-शैक्षणिक सहभाग दृढ केला आहे. या सहयोगांतर्गत सहयोगात्मक संशोधनाला चालना देण्यात येईल, तंत्रज्ञान विकासला गती देण्यात येईल आणि भविष्यासाठी सुसज्ज टॅलेंटना निपुण करण्यात येईल. हा सहयोग भारतीय भाषा, हेल्थ टेक आणि उदयोन्मुख क्षेत्रे जसे जनरेटिव्ह एआयसाठी एआयमध्ये अग्रगण्य सुधारणा करण्यावर लक्ष केंद्रित करेल, ज्यासह 'मेक इन इंडिया' आणि 'डिजिटल इंडिया' दृष्टिकोनाशी संलग्न प्रबळ इनोव्हेशन इकोसिस्टम निर्माण करण्याप्रती सॅमसंगची कटिबद्धता अधिक दृढ होईल.
या पंचवार्षिक सामंजस्य करारावर एसआरआय-एनचे व्यवस्थापकीय संचालक क्यूनग्यून रू आणि आयआयटी मद्रासचे संचालक प्रो. व्ही. कामाकोटी यांनी स्वाक्षऱ्या केल्या. या कराराचा सहयोगात्मक क्रियाकलापांची व्यापक श्रेणी प्रदान करण्याचा मनसुबा आहे, जसे प्रायोजित संशोधन प्रकल्प, सल्लागार प्रकल्प, तंत्रज्ञान परवाना, प्रशिक्षण, सुविधा विकास आणि भविष्यात विद्यार्थी फेलोशिप्सची स्पॉन्सरशिप.
''एसआरआय-एनमध्ये आम्ही सतत तंत्रज्ञान निर्माण करण्याप्रती काम करत आहोत, जे व्यक्ती व समुदायांना सक्षम करतात. आयआयटी मद्राससोबतचा आमचा सहयोग एकत्रितपणे अर्थपूर्ण, सर्वसमावेशक आणि भविष्यासाठी सुसज्ज सोल्यूशन्स निर्माण करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल आहे. एकत्रित, आमचा भारतातील प्रादेशिक भाषांच्या सखोल एकीकरणासह गॅलेक्सी एआय इकोसिस्टम सुधारण्याचा आणि देशभरातील भाषेसंदर्भातील अडथळ्यांना दूर करण्याप्रती योगदान देण्याचा मनसुबा आहे. तसेच, आम्ही उदयोन्मुख तंत्रज्ञानाच्या सहयोगाने विकास आणि कौशल्य सुधारणेमध्ये सामील होत आहोत,'' असे सॅमसंग आरअँडडी इन्स्टिट्यूट, नोएडाचे व्यवस्थापकीय संचालक क्यूनग्यून रू म्हणाले.
आयआयटी मद्रासचे संचालक प्रो. व्ही. कामाकोटी या सहयोगाबाबत उत्साह व्यक्त करत म्हणाले, ''आम्हाला एसआरआय-एनसोबत सहयोग करण्याचा अभिमान वाटतो आणि हा सहयोग एआय तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करत क्रांतिकारी संशोधन व तंत्रज्ञान विकासाला प्रायोजित करेल. झपाट्याने बदलत असलेल्या तंत्रज्ञान क्षेत्रात हा सामंजस्य करार लाभार्थींना सैद्धांतिक ज्ञान आणि व्यावहारिक उद्योग सोल्यूशन्समध्ये पक्के संबंध विकसित करण्यास अपस्किल करेल, जे जोखीमांना दूर करण्यासाठी आणि अनिश्चिततांचे निराकरण करण्यासाठी आवश्यक आहे.''
एसआरआय-नोएडा संशोधन व विकास (आरअँडडी) प्रकल्पांना प्रायोजित करेल. हे प्रकल्प आयआयटी मद्रास, कंपनीच्या परिसरामध्ये किंवा दोन्ही ठिकाणी सहयोगात्मक व्यवस्थापनाच्या माध्यमातून राबवण्यात येतील.

## पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत लॉ कॉलेजमध्ये पहिल्याच दिवशी पुष्पावर मोबाइल फोन चोरल्याचा आळ आला

**मुंबई, १९ जून :** सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल मधील पुष्पाच्या हिंमतीची, चिकटीची आणि दृढनिर्धाराची गोष्ट पाहताना प्रेक्षक त्यात गुंतून जातात. अलीकडच्या भागांमध्ये, प्रेक्षकांनी पाहिले की, पुष्पा (करुणा पांडे) आतुरतेने निकालाची वाट बघत असते कारण लॉ कॉलेजमध्ये तिचे प्रवेश मिळवणे त्याच्यावरच अवलंबून आहे.
आगामी भागांमध्ये, पुष्पाच्या जीवनात एक नवीन अध्याय उलगडताना प्रेक्षक बघतील. खूप कष्ट घेऊन, लॉ कॉलेजची प्रवेश परीक्षा उत्तीर्ण करून अखेरीस एका प्रतिष्ठित लॉ कॉलेजात जाण्याचे आपले स्वप्न पुष्पाने पूर्ण केले आहे. येथे प्रोफेसर शास्त्री (गौरव चोप्रा) यांच्या हाताखाली तिचा अभ्यास सुरू होतो. पण तिचा कॉलेजातील पहिला दिवसच एक मोठे संकट घेऊन येतो. संपूर्ण वर्गाच्या समोर पुष्पावर मोबाइल फोन चोरल्याचा आरोप घेतला जातो. या अनपेक्षित आरोपाने पुष्पाला धक्का बसतो आणि ती गांगरून जाते.
पुष्पा आपले निर्दोष असणे कसे सिद्ध करेल? या कठीण प्रसंगात प्रोफेसर शास्त्री तिला मदत करतील का? पुष्पा या संकटाचा सामना कसा करते हे अवश्य बघा.
पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत पुष्पाची भूमिका करणारी करुणा पांडे म्हणते, पुष्पाच्या प्रवासातील हा भाग खूपच अस्सल आहे. फक्त कॉलेजात प्रवेश मिळवणे इतकेच तिने साध्य केलेले नाही, तर मार्गात कोणतीही संकटे आडवी आली तरी त्यांचा सामना करून आपले स्वप्न तिने पूर्ण केले आहे. जगात अशा कितीतरी पुष्पा आहेत. अशा स्त्रिया आहेत, ज्यांनी मोठ्या कालावधीनंतर आपल्या करकीर्दीची पुन्हा सुरुवात केली आहे किंवा कित्येक वर्षांनी पुन्हा अर्ध्यावर ठेवलेले पुस्तक हाती घेतले आहे. कारण त्यांनी आपल्या स्वप्नांच्या बाबतीत कधीच हार मानली नव्हती. जेव्हा पुष्पाच्या कहाणीतून कुणाला प्रेरणा मिळाल्याचे मी ऐकते तेव्हा मला खूप छान वाटते आणि माझे काम सार्थक झाल्यासारखे वाटते. एक अभिनेत्री म्हणून काहीतरी अर्थपूर्ण साध्य केल्याची भावना होते. पुष्पाची व्यक्तिरेखा साकारणे ही केवळ एक भूमिका नाही, तर ती एक जबाबदारी आहे, जी पेलताना मला खूप आनंद आणि अभिमान वाटतो.

## राशीभविष्य

**मेष :** तब्येत नरम असेल. पूर्वी झालेल्या गंभीर आजारापासून तुम्हाला आराम मिळेल. रक्त विकारांबद्दल अधिक सतर्क रहा आणि सावधगिरी बाळगा. अन्यथा अडचणींना सामोरे जावे लागू शकते.
**वृषभ :** मोठ्यांच्या आरोग्याची काळजी घ्या, त्यांना वेळेवर औषधे द्या. मुलांकडून तुम्हाला सहकार्य मिळेल. आज एखाद्या मनोरंजक व्यक्तीची भेट होईल, तुम्ही त्यांचे कौतुक कराल.
**मिथुन :** तुमच्या मुलांकडून काही तणावपूर्ण बातम्या मिळाल्याने तुम्हाला खूप दु:ख होईल. काहीतरी अनुचित घडण्याची भीती असेल. प्रेमसंबंधांमध्ये जास्त शंका आणि संशयामुळे नात्यांमध्ये अंतर वाढेल.
**कर्क :** सामाजिक कार्यात रस कमी होईल. व्यवसाय क्षेत्राशी संबंधित लोकांना अधिक चढ-उतारांना सामोरे जावे लागेल. विद्यार्थ्यांनी शंका आणि संशय घेणं टाळा. आज वैवाहिक जीवनात जवळीकता येईल.
**सिंह :** आज मुलांच्या खेळण्यांच्या व्यवसायाशी संबंधित लोकांना विशेष फायदे मिळतील. ट्रॅव्हल एजन्सी, टॅक्सी, ड्रायव्हर, वाहतूक विभागाशी संबंधित लोकांना यश आणि आर्थिक फायदा झाला.
**कन्या :** आज व्यवसायाच्या क्षेत्रात कामाचा ताण जास्त असेल. त्यामुळे भरपूर आर्थिक लाभ होईल. नोकरीत अधीनस्थांना फायदा होईल. बचत केलेली भांडवल खर्च करण्यासोबतच तुम्हाला कर्जही घ्यावे लागू शकते.
**तुळ :** आजचा दिवस तुमच्यासाठी संमिश्र परिणामांचा असेल. खूप मेहनत केल्यानंतर तुम्हाला यश मिळेल. विरोधकही तुमच्या कमकुवतपणाचा फायदा घेण्याचा प्रयत्न करतील. तुमच्या भावनांना सकारात्मक दिशा द्या.
**वृश्चिक :** जोडीदाराकडून आज तुम्हाला एखादी भेट मिळेल, ज्यामुळे तुमचे मन प्रसन्न राहील. आज आर्थिक स्थिती सुधारेल. संपत्ती आणि मालमत्ता वाढेल. जमीनीचा जुना वाद मिटेल.
**धनु :** जे लोक मजुरी करून आपला उदरनिर्वाह करतात त्यांना विशेष यश आणि आर्थिक लाभ मिळतील. नोकरीतील तुमच्या चांगल्या समर्पणाने आणि प्रामाणिक कामाच्या शैलीने बॉस प्रभावित होईल
**मकर :** आज तुम्हाला राजकारणात महत्त्वाच्या जबाबदारी मिळण्याची शक्यता आहे. तुम्हाला सरकारी सत्तेचा लाभ मिळेल. विद्यार्थ्यांना अभ्यासाबाबत थोडी चिंता असेल. तुम्हाला जवळचा मित्र भेटेल.
**कुंभ :** आज जमिनीशी संबंधित कामात गुंतलेल्या लोकांना कठोर परिश्रमानंतर यश मिळेल. नोकरीत स्थान बदलण्याची शक्यता आहे. किंवा तुम्हाला स्थान बदलाशी संबंधित काही चांगली बातमी मिळेल.
**मीन :** आजचा दिवस संघर्षाचा असेल. एखाद्या पूर्ण होणाजया कामात अडथळे येतील. कोणाच्याही प्रभावाखाली येऊ नका. तुमच्या शहाणपणाने आणि विवेकबुद्धीने काम करा.

## बजाज आलियान्झ लाइफतर्फे महिला टर्म सर्वेक्षणचे निष्कर्ष जाहीर

**नागपूर, १९ जून :** भारतातील आघाडीच्या खासगी जीवन विमा कंपन्यांपैकी एक असलेल्या बजाज आलियान्झ लाइफ इन्शुरन्सने Pixis Global आणि Quals.AI यांच्या सहयोगाने करण्यात आलेल्या बजाज आलियान्झ लाइफ महिला टर्म सर्वेक्षणचे निष्कर्ष जाहीर केले. या सर्वेक्षणात गुणात्मक आणि संख्यात्मक अशा दोन्ही पद्धतींचा वापर करून देशातील मेट्रो, टियर १ आणि टियर २ शहरांमधील १,००० हून अधिक नोकरदार व स्वयंरोजगार करणाऱ्या महिलांचा समावेश करण्यात आला. या अभ्यासात महिलांच्या प्रमुख आर्थिक प्राधान्यक्रमांची, आपत्कालीन परिस्थितींमध्ये त्यांची तयारी किती आहे याची, तसेच दीर्घकालीन आर्थिक सुरक्षिततेकडे पाहण्याच्या त्यांच्या दृष्टिकोनाची तपासणी करण्यात आली. या सर्वेक्षणातून आर्थिक प्राधान्यक्रमांमध्ये झालेला लक्षणीय बदल समोर आला आहे ज्यामध्ये मुलांचे भविष्य, शिक्षणखर्च आणि आरोग्य या प्रमुख चिंता ठरल्या आहेत. मुलाचे भवितव्य सुरक्षित करण्यासाठी महिलांनी टर्म इन्शुरन्सला सर्वाधिक पसंती दिली आहे. ५३% महिलांनी अनपेक्षित वैद्यकीय खर्चांमुळे कुटुंबाच्या बचतीवर होणाऱ्या परिणामाबाबत चिंता व्यक्त केली, ज्यातून आरोग्यसंबंधी जोखमींबाबत जागरूकता वाढत असल्याचे दिसते. ८७% महिलांना क्रिटिकल इलनेस कव्हर अत्यंत आकर्षक वाटला असून, ५०% महिलांनी टर्म प्लॅनमध्ये आरोग्य व्यवस्थापन सेवा ही एक आवश्यक सुविधा असल्याचे मानले.
बजाज आलियान्झ लाइफ इन्शुरन्सचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी तरुण चुग यांनी सांगितले की, बजाज आलियान्झ लाइफ महिला टर्म सर्वेक्षण २०२५ मधील निष्कर्ष स्पष्ट करतात की महिलांसाठी टर्म इन्शुरन्स ही केवळ जीवन कवच नसून, त्यांच्या नीट निश्चित केलेल्या आर्थिक प्राधान्यांसोबत सुसंगत एक सर्वसमावेशक आर्थिक उपाय आहे. त्यांच्या अपेक्षा या टर्म प्लॅनकडून मुलांच्या आर्थिक भविष्याचे संरक्षण, आरोग्यसंबंधी खर्च, गंभीर आजारांसाठी कवच आणि संपूर्ण कुटुंबासाठी आर्थिक सुरक्षितता यांचा समावेश करतात. हे निरीक्षण आम्हाला आमच्या महिला ग्राहकांच्या दीर्घकालीन आर्थिक उद्दिष्टांची पूर्तता करणाऱ्या विशिष्ट गरजांना उद्देशून उपाय तयार करत राहण्यास मार्गदर्शन करत राहील.

## झी टीव्हीचे कलाकार आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने सजगपणे जगणे साजरे करण्याचे आवाहन!



**मुंबई, १९ जून :** अख्खे विश्व ११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या तयारीत असताना २०२५ ची संकल्पना आहे एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग. ही संकल्पना आपल्याला वैयक्तिक आरोग्य आणि आपल्या ग्रहाच्या आरोग्यातील गहन संबंधाची आठवण करून देते. प्राचीन शिकवण असलेला योग हा केवळ व्यायाम नसून तो आंतरिक समतोल आणि सजग जीवनाकडे नेणारा मार्ग आहे. यावर्षी झी टीव्हीवरील कलाकार सरू मधील अनुष्का मर्चंडे, जाने अनजाने हम मिले मधील सेहज राजपूत, जागृति एक नयी सुबह मधील विजयेंद्र कुमेरिया आणि जमाई नं.१ मधील सिमरन कौर योगामुळे त्यांच्यावर झालेला शारीरिक, मानसिक आणि भावनिक परिणाम सांगत आहेत, आणि पर्यावरणाबाबत अधिक सजग राहून एक समजूतदार जीवनशैली स्वीकारण्याची प्रेरणाही देत आहेत.
झी टीव्हीच्या जमाई नं.१ मध्ये रिद्धीची भूमिका साकारणारी सिमरन कौर म्हणाली, माझ्यासाठी योग केवळ फिटनेस नाही तो वैयक्तिक आरोग्य आणि पृथ्वीच्या कल्याणातील दुवा आहे. मी पूर्वी कार्डिओ आणि स्ट्रेंथ ट्रेनिंग करत असे, कारण मला फिट राहायचं होतं. पण हळूहळू लक्षात आलं की खरे आरोग्य हे आतून येते शरीर, मन आणि स्वभाव यांचा समतोल राखण्यात ते आहे. आता माझी सकाळ १०-१५ मिनिटे ध्यान आणि दीर्घश्वासासह सुरू होते अनेकदा मी फक्त खिडकी उघडून बाहेरचे आवाज ऐकते. त्यामुळे मला माझा दिवस विनम्रपणे आणि कृतज्ञतेने सुरू करता येतो. योगाने मला शिकवलं की तो फक्त फक्त मॅटपुरता मर्यादित नाही, तर आपण कसा विचार करतो, दुसऱ्यांशी कसे वागतो, आणि कसे संवाद साधतो यावरही त्याचा प्रभाव असतो. निरोगी पृथ्वीची सुरुवात निरोगी विचार आणि शरीरातूनच निर्माण होऊ शकते, आणि योगच हे साध्य करू शकतो.
झी टीव्हीच्या सरू मध्ये अनिकाची भूमिका साकारणारी अनुष्का मर्चंडे म्हणाली, प्रत्येक रविवारी, सूर्योदय झाला की मी आणि माझ्या बहिणी योगा मॅट घेऊन बाहेर बसतो ही परंपरा अनेक वर्षांपूर्वी सुरू झाली होती आणि आता ती आमच्या आयुष्याचा भाग झाली आहे. व्यायाम, हास्य आणि शांत मनन यामध्ये आम्ही एकमेकींशी आणि स्वत:शी पुन्हा पुन्हा जोडल्या जातो. मला आमचं पहिलं सेशन अजूनही आठवतं लिव्हिंग रूममध्ये यूट्यूबवरचे व्हिडिओ डाव्या आणि उजव्याच्या गोंधळात आम्ही असायचो, संतुलन साधताना धडपडायचो. हळूहळू आम्ही जवळच्या पार्कमध्ये जाऊ लागलो मोकळ्या आकाशाखाली, गवतावर अनवाणी, निसर्गातील आवाजांनी वेढलेले, त्या अनुभवात फारच शांतता होती. यंदा योग दिनाची सुरुवात आम्ही १२ सूर्यनमस्कारांनी करू, मग ध्यान करू आणि नंतर स्वत:बद्दल काहीतरी लिहू जे प्रेमाने आणि विचारपूर्वक पुढे जाण्यास मदत करतं.

## शब्दकोडे क्रमांक २१४१



आडवे शब्द :-
१) उर्ध्व दिशा
३) द्रव पदार्थ
५) द्रव्य
७) घागर
९) पारद
११) रजनी
१२) भारतीय सैनिक
१३) वळवळ हावरटपणा
१५) संपूर्ण
१६) सप्तस्वरातील पहिला स्वर
१९) भोळा शंकर, ** सदाशिव
२०) लोक
२१) चरण-कमल
२३) चांगला , भला
२५) चरबी वाढविणारे पदार्थ
२६) किल्ल्याखालची जमीन
२८) ढीग
३०) पूजा साहित्याचे ताट
३२) उणीव, तोटा
३३) गणपतीचे एक नाव
३५) बारीक सारीक माहितीसह
३७) बांबू
३९) वड समाजातील पत
४०) दर्पण
४१) व्रत
४२) दुष्ट
४४) समोरासमोरची लढाई
४५) रावणाचा वध करणारा
४६) स्थान
४७) बारा वर्षांचा काळ
४९) हद्द
५०) अभिप्राय
५१) हत्ती
५३) पाठवणी
५६) रेवा नदीचे एक नाव
५७) बैलाच्या गळ्याला बांधण्याचा दोर
५९) संरक्षक भिंत
६०) चांदणी
६२) सारखा
६४) काकुळतेने याचना करणे (वा.प्र.)
६८) छोटा खड्डा
७०) किंमत, भाव
७१) परभारे
७२) पिता
७३) एक चर्मवाद्य
७४) उगाच
७५) बातमी

उभे शब्द :-
१) वर वधुची मिरवणूक
२) निमग्न
३) धोबी
४) प्रश्नोत्तरे
६) व्यापारातील फायदा
७) फुलाची उमलण्या पूर्वीची अवस्था
८) अब्रू
९) भिंतीवर सरपटणारा प्राणी
१०) गुजराती नृत्यप्रकार
१४) सख्खा भाऊ
१५) कारण, निमित्त
१७) विष
१८) घराचा मागचा दरवाजा
२१) पौर्णिमा किंवा अमावस्याच्या अगोदरची तिथी
२२) फुलातील पुंकेसर
२४) रत्न
२७) पंकज
२९) आरास, शोभा, सुशोभित रचना
३१) काटकसर
३२) रुग्णालय
३४) अभिनेता
३६) अर्धी ओंजळ
३७) कशा प्रकारचा अरुंद, व लांब पिशवी
३८) युक्ती
४१) भूत आणि भविष्यामधील काळ
४२) लाकडी पादुका
४३) घोडे बांधण्याची जागा
४४अ) कामदेव
४५) मनाचे श्लोक लिहिणारे संत
४६) माहितगार
४८) माघारी येणे
५२) शोभिवंत सजावट
५४) रस्ता, मार्ग
५५) श्रीकृष्णाने अर्जुनाला केलेला उपदेश
५८) बेचव, पचपचीत
६१) शुष्कता, आग, भकभक
६३) मळलेला
६४) पाऊल, गीत
६५) डोंगराचा तुटलेला भाग
६६) मांडणी
६७) तूर डाळीचे एक कालवण
६९) एक रंगीत कंदमूळ
७१) पंख

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दि | वा | ळी | द | स | रा | हा | त | पा | य | प | स | रा | | म |
| वा | ट | | श | र | म | | र | या | | हा | ट | | स | दा |
| | मा | हे | र | | भ | क्र | स | | को | रे | | मी | | र |
| वा | री | | थ | | रो | ख | | ज | न | क | ज | न | नी | |
| म | | मा | | वा | से | | सा | ल | | री | त | | र | ड्डा |
| ना | र | ळी | भा | त | | द | ग | द | ग | | न | ल | द | |
| व | क्त | | म्य | | त | या | र | | ड | र | | ठ्ठ | | मु |
| ता | | अ | वा | स्त | व | | त | ड | क | सा | र | | मु | रा |
| र | म | जा | न | | स | क | ट | | री | | स | र | क्रा | री |
| | स | ण | | पा | ळी | व | | का | | सा | द | | द | |
| आ | | ता | प | ट | | न | य | न | र | म्य | | को | म | ल |
| पो | क | | ल | | तं | | म | | म | | पा | य | | ला |
| आ | ट | पा | ट | न | ग | र | | क | णी | दा | र | | न | ट |
| प | | व | ण | वा | | ज | हा | ल | | द | | आ | ग | |
| | खा | स | | र | त्ना | क | र | | प | र | त | प | र | त |

# पती, पत्नीसह चिमुकलीवर शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार

■ महासागर प्रतिनिधी,
**वणी , दि. १९ :** उत्तराखंड येथे हेलिकॉप्टर दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या जयस्वाल पती, पत्नी व चिमुकलीच्या पार्थिवावर वणी येथील मोक्षधाम येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या राहत्या घरून फुलांनी सजलेल्या ट्रॅक्टरमधून अंत्ययात्रा काढण्यात आली. त्यांना शेवटचा निरोप देण्याकरिता नातलग, आप्तस्वकीय व मित्रपरिवाराने मोठी गर्दी केली होती.



वणी शहरातील व्यावसायिक व कोल ट्रान्सपोर्टर राजकुमार उर्फ राजा सुरेश जयस्वाल, त्यांची पत्नी श्रद्धा जयस्वाल व दोन वर्षांची मुलगी काशी यांचा १२ जूनला सकाळी ५.२० वाजता केदारनाथ जवळ हेलिकॉप्टर दुर्घटनेत मृत्यू झाला होता.

राजकुमार जयस्वाल हे ९ जूनला आपल्या परिवारासह उत्तराखंड येथे चारधाम यात्रेकरिता गेले होते. त्यांच्या सोबत त्याचे साडू प्रविण महाजन व मेहुणी पूजा महाजन हे दाम्पत्य देखील देवदर्शनासाठी गेलं होतं. केदारनाथ वरून गुप्तकाशीला जात असताना अचानक हेलिकॉप्टर कोसळले. त्यात जयस्वाल पती, पत्नी व चिमुकल्या मुलीचा मृत्यू झाला. तर महाजन दाम्पत्याला दुसऱ्या हेलिकॉप्टरने प्रवास करत असल्यामुळे सुदैवाने ते बचावले. जयस्वाल दाम्पत्य व त्यांची मुलगी या तिघांचेही मृतदेह रुद्रप्रयाग (उत्तराखंड) वरून दिल्ली, नागपूर वरून बुधवारी सकाळी ८ वाजताच्या दरम्यान वणी येथे आणण्यात आले होते. मोक्षधाम येथे सकाळी ११ वाजता अंत्यसंस्कार केले. पती व पत्नीला मुखाग्नी दिला. तर चिमुकली काशी भूमातेच्या कुशीत विसावली.

यावेळी खा. प्रतिभा धानोरकर, आ. संजय देरकर, माजी आ. संजीवरेड्डी बोदकुरवार, मनसे नेते राजू उंबरकर, एसडीपीओ गणेश किंद्रे, ठाणेदार गोपाल उंबरकर यांच्यासह राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर अंत्ययात्रेत सहभागी झाले होते. यावेळी पोलिसांचा बंदोबस्तही ठेवला होता.

## आ. वानखेडेंनी घेतला कर्जवाटपाचा आढावा

**उमरखेड :** आमदार किसनराव वानखेडे यांनी उपविभागीय कार्यालयात खरीप कर्ज वाटप संबंधाने उमरखेड तालुक्यातील राष्ट्रीयकृत बँकेच्या ९ शाखा, विदर्भ कोकण ग्रामीण बँक १ शाखा, खाजगी बँक १ शाखा आणि यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या ८ शाखांच्या शाखा व्यवस्थापकांची सभा घेतली. तसेच शेतकऱ्यांना वेळेत खरीप कर्ज वाटप करण्याबाबत सूचना दिल्या. सभेला उपविभागीय अधिकारी एस. पी. मुळे उपविभागीय अधिकारी, तहसीलदार आर. यू. सुरडकर व सहायक निबंधक ओ. एम. पहुरकर उपस्थित होते. शेतकरी सभासदांची आर्थिक उन्नती साधण्यासाठी शेतीशी निगडीत असणारे लघुउद्योग व व्यवसायासाठी कर्ज उपलब्ध करुन द्यावे. तालुक्यातील शेतकरी सभासदांना सावकाराकडे जाऊ न देता बँकेकडून कर्ज देण्याबाबत आवाहन केले आहे. तालुक्यातील सुशिक्षित बेरोजगारांना लघु उद्योगासाठी अल्प व्याज दरात कर्ज उपलब्ध करुन देण्याच्याही सूचना करण्यात आल्या. खरीप हंगाम २०२५-२६ मध्ये तालुक्यातील यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सर्व संलग्न शाखांनी दि. १० जूनपर्यंत ६ हजार २७६ सभासदांना ४५ कोटी ७८ लाख रुपये कर्जवाटप केले आहे.

# तरुणाला ऑनलाइन लुटले अनब पेट्रोलपंपावरून रोख घेतली

### फ्रेजरपुरा पोलिसांकडून २ लुटारूंना अटक

■ महासागर प्रतिनिधी,
**अमरावती , दि. १९ :**
१९ वर्षीय तरुणाला धमकावून व चाकू लावून त्याला 'डिजिटल पेमेंट ॲप'चा पासवर्ड विचारून लुटणाऱ्या दोघांना फ्रेजरपुरा पोलिसांनी मंगळवारी (दि. १७) अटक केली. दोन्ही लुटारूंकडून गुन्ह्यातील तीन हजार रुपये, चाकू, दुचाकी, मोबाइल व मनगटी घड्याळ असा मुद्देमाल जप्त केला. या लुटारूंनी ऑनलाइन लुटलेली रक्कम नजीकच्या पेट्रोलपंपावर जाऊन तेथील सेल्समनला दिली. त्यानंतर त्या सेल्समनकडून तीन हजार रुपये रोख घेतले. त्याच सुगाव्यावरून पोलिसांनी त्यांना पकडले. इजानोद्दीन पठाण हकीमोद्दीन पठाण (२२) व आमिर खान इरफान खान (३०, दोघेही रा. इंदला) अशी अटक केलेल्या लुटारूंची नावे आहेत. स्थानिक केवल कॉलनी येथील पुष्पल नावाडे (१९) हा १४ जून रोजीला रात्री मित्राची वाट पाहत इंदला फाट्यासमोरील एका हॉटेलसमोर मोपेडसह उभा होता. रात्री साडेदहा वाजताच्या सुमारास एका दुचाकीवर आलेल्या दोघांनी पुष्पलला चाकूचा धाक दाखवत मारण्याची धमकी दिली. त्यानंतर ते पुष्पलला काही अंतरावर घेऊन गेले.

त्यावेळी खिशातील पैसे काढण्यास सांगितले. पुष्पलने नकार दिला असता लुटारूंनी पैसे लागतीलच, अशी धमकी त्याला दिली. त्यामुळे पुष्पलने त्याच्या मित्राला फोन पेद्वारे तत्काळ तीन हजार रुपये मागितले. मित्राने पैसे पाठवल्यानंतर दोघांपैकी एका आरोपीने एटीएमचा पासवर्ड विचारून मी पैसे काढून आणतो, असे म्हणत तो पुष्पलचीच दुचाकी घेऊन गेला. त्यानंतर काही वेळातच लुटारूने दुचाकी परत देऊन या घटनेबाबत कोणाला सांगितल्यास मारून टाकू अशी धमकी देऊन पळ काढला. दरम्यान गुन्हा दाखल होताच फ्रेजरपुरा पोलिसांनी त्या भागातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली. त्यातून इजानोद्दीन पठाण व आमिर खान इरफान खान यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. फ्रेजरपुराचे नव्यानेच जबाबदारी मिळालेले ठाणेदार रोशन शिरसाट, पीआय नीलेश गावंडे (गुन्हे) यांच्या नेतृत्वातील पीएसआय राहुल महाजन व त्यांच्या पथकाने ही कारवाई केली आहे.

सेल्समनकडून घेतली रोख रक्कम पुष्पलकडे रोख नसल्यामुळे त्याने जीवाच्या भीतीने मित्राकडून डिजिटल पेमेंट ॲपवर तीन हजार रुपये लुटारूंना देण्यासाठी बोलावले. ती रक्कम येताच लुटारूने पुष्पलकडून मोबाइल व पासवर्ड विचारून घेतला आणि नजीकचे पेट्रोलपंप गाठले. लुटारूने पेट्रोलपंपावरील सेल्समनला माझ्याकडे ऑनलाइन रक्कम आहे, मी तुला देतो, तू मला रोख स्वरुपात दे, असे म्हटल्यावर त्या सेल्समनले होकार दिला. त्यानंतर लुटारूने पुष्पलच्या मोबाइलवरून सेल्समनला ऑनलाइन रक्कम दिली व रोख घेतली. यातच लुटारू अडकले.

# शेवटच्या लाभार्थ्यांपर्यंत आरोग्य सेवा पोहचवा: डॉ. सुभाष ढोले



■ महासागर प्रतिनिधी,
**यवतमाळ , दि. १९ :**
शहरासह ग्रामीण भागातील शेवटच्या लाभार्थ्यांपर्यंत आरोग्य सेवा पोहोचवायला हवी अशा सूचना जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुभाष ढोले यांनी दिल्या . तसेच दुर्बल घटकांवर विशेष लक्ष केंद्रित करून ही मोहिम शहरी व ग्रामीण भागातील झोपडपट्टी, वाड्या वस्ती, तांडे, वीटभट्टी तसेच बांधकाम साइटवर राहत असलेल्या बालकांपर्यंत पोहोचवण्यात येणार आहे.

स्टॉप डायरिया कॅम्पेनचे जिल्हास्तरीय उद्धाटन आयुष्मान आरोग्य मंदिर उपकेंद्र, करळगाव येथे डॉ. सुभाष ढोले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. अतिसाराच्या घटनांमध्ये ओरल रिहायड्रेशन सोल्युशन, झिंक सप्लीमेंटेशन आणि पोषणाकरिता योग्य पूरक पोषक आहार यांचा योग्यरीत्या वेळीच वापर केल्यास अतिसारामुळे होणारे मृत्यू लक्षणीयरीत्या कमी होऊ शकतात. आणि बालकांचे आरोग्य सुधारू शकते. या समस्येचे प्रभावी निराकरण करण्यासाठी केंद्र शासनाच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने स्टॉप डायरिया कॅम्पेन सुरू केले असून सदर मोहिम १६ जून ते ३१ जुलै पर्यंत राबवण्यात येणार आहे.

तसेच १५ जून ते ३० जून दरम्यान सिकलसेल जनजागृती पंधरवडा राबवण्यात येत आहे.

**स्टॉप डायरिया कॅम्पेनचे जिल्हास्तरीय उद्धाटन आयुष्मान आरोग्य मंदिर उपकेंद्र, करळगाव येथे डॉ. सुभाष ढोले यांच्या हस्ते करण्यात आले.**

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी कैलास जवंजाळ यांनी केले. तर प्रास्ताविक माता बाल संगोपन अधिकारी डॉ. कपिल गोटे यांनी केले. तसेच आभार आरोग्य सेवक पी.आर. पांडे यांनी मानले. प्राथमिक आरोग्य केंद्र मागणी तसेच तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयाचे कर्मचाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. यावेळी अनेकांची उपस्थिती होती. याप्रसंगी गटविकास अधिकारी मडावी, बाभूळगाव, माता बाल संगोपन अधिकारी डॉ. कपिल गोटे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. क्रांतीकुमार नावंदीकर, तालुका आरोग्य अधिकारी, डॉ. संघर्ष राठोड, वैद्यकीय अधिकारी डॉ. अर्पित भगत, समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. हिना बेताल, चंचला मुंदाने, सुचिता ठाकरे, जिल्हा सिकलसेल समुपदेशक गजेंद्र कांबळे इतर कर्मचारी, आशा स्वयंसेविका व नागरिक उपस्थित होते.



## मातंग समाजाच्या उपवर्गीकरणाला मुख्यमंत्री फडणवीसांची हिरवी झेंडी

**उमरखेड :** मागील अनेक वर्षांपासून राज्यातील मातंग समाज बांधवांच्या अनुसूचित जाती अ, ब, क, ड उपवर्गीकरण करण्याच्या मागणीला अखेर यश आले. यासंदर्भात महाराष्ट्रातील मातंग समाज बांधवांच्या समितीसोबत गुरुवार दि. १२ जून रोजी झालेल्या मुख्यमंत्र्याच्या दालनातील बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येत्या दोन महिन्यांत उपवर्गीकरण करुन देण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे मातंग समाजाच्या उपवर्गीकरणाला हिरवी झेंडी मिळाल्याचे माजी आमदार नामदेव ससाणे यांनी त्यांच्या निवासस्थानी बुधवार दि. १८ जून रोजी आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले. बार्टीची स्थापना झाल्यानंतर त्यामध्ये ५८ प्रकारच्या जातींचा समावेश करण्यात आला. या धर्तीवर ज्यावेळी विकास कामे सुरू झाली. मातंग समाजाचा पाहिजे तसा विकास झाला नाही. १९६१ व १९८१ च्या जनगणनेनुसार तसेच यानंतर झालेल्या सन १९९१ मधील जनगणनेत मातंग समाजाला दूर ठेवण्यासाठी शांत डोक्याने वापर केला गेल्याचा आरोप ससाने यांनी या वेळी केला. आज रोजी महाराष्ट्रात बौद्ध समाजाची संख्या ही ८० लाख ६० हजार आहे तर मातंग समाजाची लोकसंख्या २४ लाख ८८ हजार आहे. ही आकडेवारी शासनाची असून ३५० कोटी रुपये दरवर्षी विकासासाठी शासन निधी बार्टीला देते.

# जिल्हाधिकाऱ्यांकडून फळबाग आणि ॲग्रीस्टॅकसह विविध विषयांचा आढावा

■ महासागर प्रतिनिधी,
**यवतमाळ , दि. १९ :**



महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत तालुक्यांना फळबाग लागवडीचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. उद्दिष्टाप्रमाणे फळबाग लागवड करा. कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ ॲग्रीस्टॅक नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांनाच दिला जाणार आहे?. त्यामुळे फळबाग लागवडीसह ॲग्रीस्टॅक नोंदणी वाढवण्याचे निर्देश जिल्हाधिकारी विकास मीना यांनी दिले.

महसूल भवन येथे जिल्हाधिकाऱ्यांनी मनरेगा अंतर्गत फळबाग, तुती, बांबू लागवड, ॲग्रीस्टॅक नोंदणी, शाळा प्रवेशोत्सव, धरती आबा अभियान, गावनिहाय शेतकऱ्यांच्या जनजागृती सभा, कृषी केंद्रांची तपासणी, कृषी निविष्ठांची लिंकींग, बोगस बियाणे, खते, औषधांची विक्री, जागा नसलेल्या घरकुल लाभार्थींना जमिनीची उपलब्धता, घरकुल लाभार्थींना वाळू वाटप आदींचा आढावा घेतला, त्यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी या सूचना केल्या. बैठकीला जिल्हाधिकाऱ्यांसह अप्पर जिल्हाधिकारी अनिल खंडागळे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे, निवासी उपजिल्हाधिकारी सुदर्शन गायकवाड, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रांजल शिंदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रकाश नाटकर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संतोष धोत्रे, शिक्षणाधिकारी प्रकाश मिश्रा तसेच दूरदृष्यप्रणालीद्वारे सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, कृषी सहायक उपस्थित होते. जिल्ह्यात यावर्षी १० हजार हेक्टरवर फळबाग लागवडीचे उद्दिष्ट आहे. तालुकानिहाय ग्रामसेवकांना लागवडीचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. उद्दिष्टांप्रमाणे लागवड होणे आवश्यक आहे. ज्या ठिकाणी ॲग्रीस्टॅक नोंदणी कमी आहे, तेथे प्रमाण वाढविण्यात यावे. एकही शेतकरी ॲग्रीस्टॅक नोंदणीपासून वंचित राहता कामा नये.

फळबाग लागवड आणि नोंदणीत माघारलेल्या तालुका कृषी अधिकारी आणि कृषी सहायकांची स्वतंत्र बैठक घेतली जातील, असे जिल्हाधिकारी म्हणाले. शेतकऱ्यांना या हंगामात कृषी निविष्ठा विक्री करतांना कुठेही लिंकिंग होता कामा नये. बोगस खते, बियाणे, औषधांची विक्री होऊ नये. जिल्ह्यातील सर्व कृषी केंद्रांची तपासणी करा. याबाबत कुठेही गैरप्रकार होत असल्याचे आढळल्यास तत्काळ कारवाई करा. धरती आबा जन जातीय ग्राम उत्कर्ष अभियानांतर्गत जिल्ह्यातील ३६६ गावांमध्ये विशेष शिबिरे ३० जूनपर्यंत घेण्यात येत आहे. सर्व १७ विभागांनी यात सहभागी होऊन जास्तीत जास्त लाभार्थींना लाभ देण्यात यावा, असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

शाळा प्रवेशोत्सव साजरा करा सोमवारी २३ जूनपासून शाळा सुरु होत आहे. संपूर्ण जिल्ह्यात विद्यार्थ्यांना पहिल्या दिवशी गणवेश, मोफत पाठ्यपुस्तके वितरीत करण्यात यावी. लोकप्रतिनिधी, पालक, गावकऱ्यांना प्रवेशोत्सवासाठी निमंत्रित करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

# पैनगंगा नदीवरील जीर्ण पुलामुळे अपघात होण्याची शक्यता

■ महासागर प्रतिनिधी,
**महागाव, दि. १९ :**
पैनगंगा नदीवर असलेला ब्रिटिश कालीन पूल जीर्ण झाला आहे. त्याला संरक्षक कठडे नसल्याने वाहनधारकांना प्रवास करताना जीवावर उदार होऊन मार्गक्रमण करावे लागत आहे. त्यामुळे नुकत्याच घडलेल्या कुंडमळा दुर्घटनेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी नव्याने बांधण्यात आलेला पुल वाहतुकीस सुरू करण्याची मागणी होत आहे.



विदर्भ व मराठवाड्याच्या सीमेवरून वाहणाऱ्या पैनगंगा नदीवर धनोडा येथे असलेला पूल हा ब्रिटिश कालिन आहे. काही वर्षांपूर्वी त्यांची कालमर्यादा संपल्याचे पत्र इंग्लंडवरून प्रशासनाला आल्याची माहिती आहे. हा पूल जीर्ण झाला असून अनेक ठिकाणी खड्डे पडले आहेत. मागील वर्षी आलेल्या पुराच्या पाण्यात या पुलावरील लोखंडी संरक्षक कठडे वाहून गेले. परंतु, वर्षभराचा कालावधी उलटूनही या पुलाला संरक्षक कठडे बसविण्यात आले नसल्याने वाहनधारकांना आपला जीव मुठीत घेवुन प्रवास करावा लागत आहे. या पुलावरून साडेतीन शक्तीपीठपैकी एक असलेले माता रेणुका, श्री दत्तशिखर, अनुसया माता मंदिर आहे. या ठिकाणी दर्शनासाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या भाविकांच्या वाहनांची वर्दळ असते. या पुलाची उंची अंदाजे ३० ते ४० फुट आहे तर खाली पैनगंगेचे विस्तीर्ण पात्र आहे. या पुलाला संरक्षक कठडे नसल्याने वाहन धारकांना जीव मुठीत घेवून प्रवास करावा लागतो.

या पुलावरून नदी पात्रात वाहने कोसळल्याच्या अनेक घटना घडल्या. त्यामुळे सामजिक कार्यकर्त्यांनी संबंधित राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व बांधकाम विभागाकडे संरक्षक कठडे बसविण्यात यावे, अशी मागणी केली. परंतु, या मागणीकडे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व संबंधित बांधकाम विभागाने दुर्लक्ष केले आहे. पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील कुंडमळा येथील इंद्रायणी नदीवर असलेला पुल कोसळल्याची दुर्घटना नुकतीच घडली.

त्यामध्ये निष्पाप लोकांना आपला जीव गमवावा लागला. भविष्यात धनोडा पुलावर दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने कुंडमळा घटनेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी धनोडा येथील जुना पुल वाहतुकीसाठी बंद करून नव्याने बांधण्यात आलेला पुल वाहतुकीस सुरू करण्यात यावा अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

## 'हम क्राइम ब्रांच वाले है' म्हणत लूटमार

**मोर्शी:** 'हम क्राईम ब्रांच वाले है, इस रोडपर डकैती हो रही है और तू सोना पहनकर जा रहा है' म्हणत माजी आमदार आणि माजी मंत्री यांच्या स्वीय सहायकांच्या भावाला लुटल्याचा थरारक प्रकार समोर आला आहे. यावेळी त्यांच्या खिशात ३५ हजार रुपये देखील होते, परंतु कागदासोबत ते रुमालात गुंडाळलेले असल्याने बचावले.


**कामठी नगर परिषद, कामठी**
**बांधकाम विभाग**
**जिल्हा नागपुर ४४१००२**
Phone 07109 288262, Fax: 07109286665 Mail: chiefofficermckamptee@gmail.com
जाक्र/नपका/सां.बा. वि/३०४६/२०२५ दि.:१९/०६/२०२५

**निविदा सुचना २०२५-२०२६**

नगर परिषद कामठीला महाराष्ट्र शासनाचे खात्यात पंजीबध्द असलेल्या योग्य त्या वर्गात नोंदणीकृत अनुभवी कंत्राटदाराकडून नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजना अंतर्गत एकूण ११ कामाचे द्वी लिफाफा पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहे. निविदेबाबतची सविस्तर माहिती दिनांक २०/०६/२०२५ पासुन नगर परिषद कामठी जुने कार्यालय येथील बाधकाम विभागात पाहण्यास उपलब्ध आहे.

संदीप बोरकर
मुख्य अधिकारी तथा प्रशासक
नगर परिषद कामती


# नाला खोलीकरण, सरळीकरण कामास सुरुवात शेतकऱ्यांच्या लढ्याला यश

■ महासागर प्रतिनिधी,
**पुसद , दि. १९ :**
सुमारे नऊ महिन्यांपूर्वी झालेल्या अतिवृष्टीमुळे तालुक्यातील अनेक गावातील ओढ्या काठच्या शेतीचे मोठे नुकसान झाले. ही बाब शासनाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी अनेक प्रयत्न केले. मात्र, यावर कोणतीही कार्यवाही न झाल्याने १५ दिवसांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस(श.प.) पक्षाच्या पदाधिकारी व पीडित शेतकऱ्यांसह पत्रकार परिषद घेऊन आंदोलनाचा इशारा दिला होता. परिणामी प्रशासनाला जाग येऊन नाला खोलीकरण,सरळकरण कामाला सुरवात झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या लढ्याला अंशतः का असेना यश मिळाल्याचे प्रदेश सरचिटणीस शरद मैंद यांनी सांगितले.



सांडवा, मांडवा, बोरी (म.), बोरगडी, बोरी व कोपरा या परिसरातील नाल्याला दरवर्षी महापूर येत असल्याने लगतच्या शेतीचे नुकसान होते. रविवार दि. १ जून रोजी पत्रकार परिषदेद्वारे आंदोलनाचा इशारा देऊन प्रश्नाला वाचा फोडली. आंदोलनाचा इशारा मिळताच कामाला सुरुवात करण्यात आली. यावेळी परिसरातील असंख्य शेतकरी उपस्थित होते.

कामाचा दिखावा करू नये कामे उन्हाळ्यात होण्याची गरज असताना पावसाळ्यात सुरवात होत आहे. त्यामुळे थातूर-मातुरकाम करून व पाऊस पडताच कामे बंद होतील. त्यामुळे कामे सुरु केल्याचा केवळ दिखावा ठरू नये अशी भिती मैंद यांनी व्यक्त केली.

## तुषारद्वारे पाणी देण्याची शेतकऱ्यांवर वेळ



**फुलसावंगी :** महागाव तालुक्यातील फुलसावंगी परिसर हा सुपीक शेतीसाठी प्रसिद्ध आहे. येथील उपजाऊ जमिनीवर कापूस आणि सोयाबीन ही प्रमुख पिके घेतली जातात. यंदा मे महिन्याच्या शेवटी पावसाने चांगली हजेरी लावल्याने खरीप हंगामाला वेळेत सुरुवात होईल, अशी शेतकऱ्यांना आशा होती. मात्र, सुरुवातीच्या दोन मोठ्या पावसानंतर गेल्या आठ दिवसांपासून पावसाने उसंत घेतल्याने कोरडवाहू शेतकऱ्यांच्या पेरण्या लांबणीवर गेल्या आहेत. यामुळे शेतकरी चिंतेत असून, आधीच पेरणी केलेल्या पिकांवर करपण्याचे संकट घोंगावत आहे. मे महिन्याच्या शेवटी झालेल्या पावसामुळे मान्सून वेळेत दाखल होईल, या अपेक्षेने अनेक शेतकऱ्यांनी पेरणीची घाई केली. जवळपास ८० टक्के पेरण्या झाल्या आहेत. कापूस, सोयाबीन, हळदीच्या पेरण्या मोठ्या प्रमाणात झाल्या. परंतु, आता पावसाने आठवडाभरापेक्षा जास्त काळ विश्रांती घेतल्याने जमिनीतील ओल कमी होऊ लागली आहे. पेरणी केलेली पिके पाण्याअभावी करपण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. विशेषतः कोरडवाहू शेतकऱ्यांसमोरील अडचणी वाढल्या आहेत. पावसाच्या प्रतीक्षेत त्यांची नजर आभाळाकडे लागली आहे. ज्या शेतकऱ्यांनी पेरणी केली आहे, त्यांच्यासाठी तुषार सिंचन हा एकमेव आधार ठरला आहे. ज्यांच्याकडे विहिरी किंवा अन्य सिंचन सुविधा आहेत ते तुषार सिंचनाद्वारे पिकांना पाणी देत पिकांना वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र, अशा सुविधा नसलेल्या कोरडवाहू शेतकऱ्यांची अवस्था बिकट आहे.


**नगर परिषद काटोल जिल्हा नागपूर**
**जाहीर ई-निविदा सुचना**
न.प.का./अग्नि वि./जा.क्र./३०/२०२५ दि. १९/०६/२०२५

**जाहीर ई-निविदा सूचना सन २०२५-२६ (तिसरी वेळ)**

नगर परिषद मार्फत पंजीकृत कंत्राटदार / अभिकर्ता कडून अग्निशमन विभागा करीता ई-निविदा मागविण्यात येत आहे. निविदे चा विस्तृत नमुना निविदा नोटीस प्रसिद्धी सूचना शुद्धीपत्रे इत्यादी आपणास दि.१९/०६/२०२५ वेळ सायंकाळ ५.३० वाजतापासून महाराष्ट्र शासनाच्या http://mahatender.gov.in या संकेतस्थळावर पाहावण्यास व भरण्यास मिळेल. सदर निविदा प्रक्रिया ई - निविदापद्धतीने सदर करावयाच्या आहेत.

(धनंजय बोरीकर)
मुख्याधिकारी तथा प्रशासक
नगर परिषद काटोल



: आरएनआय रजिस्ट्रेशन क्रमांक : ६६०३२/१९९७
महासागर
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट.नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, परमार कॉम्पलेस हवालदारपूरा वर्धा - ४४२००१ येथे प्रकाशित केले आहे.
संपादक- श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, मुख्य कार्यालय मो.नं. ७४४७७३५८५१, ९९२२९७००२३ स्थानिक संपादक नरेंद्र देशमुख मो.९०११०५८३७२ (पी.बी.आय. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.

# अरण्यऋषी!



**पद्मश्री सन्मानित, पर्यावरण आणि वन्यजीव लेखक 'अरण्यऋषी' म्हणून ओळखले जाणारे ज्येष्ठ लेखक आणि माजी वनाधिकारी मारुती चितमपल्ली यांचे आज १८ जून रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. ते ९३ वर्षांचे होते. सोलापूरमधील त्यांच्या राहत्या घरी सायंकाळी सात वाजता त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने भारतीय पर्यावरण आणि साहित्य क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.**

मराठी वन्यजीव अभ्यासक आणि लेखक म्हणून मारुती चितमपल्ली अख्ख्या महाराष्ट्राला परिचीत आहेत. वनाधिकारी म्हणून दीर्घकाळ म्हणजे ३६ वर्षे नोकरी, नोकरीदरम्यान आणि त्यानंतरही ६५ वर्षे जंगलात काढणारे चितमपल्ली यांनी जंगलातील प्राणीजीवन आणि त्याचे बारकावे रेखाटणारे लेखन अतिशय ओघवत्या शैलीत केले. त्यांचे वाचनही प्रचंड होते आणि त्यांना पुस्तकांचीही आवड होती. पक्षीतज्ज्ञ डॉ. सलीम अली, लेखक व्यंकटेश माडगूळकर तसेच प्रसिद्ध चित्रकार ए. ए. आलमेरकर यांच्याशी त्यांचा स्नेह होता.

चितमपल्ली यांचा जन्म ५ नोव्हेंबर १९३२ चा सोलापुरातला. त्यांचे वास्तव्य गुजराथीमिश्रित मराठी बोलणाऱ्यांच्या वाड्यात होते. त्यांचे आजोबा सोलापुरातल्या बुधवार पेठेत राहत. तेथे तेलुगू बोलणाऱ्यांची वस्ती होती. मुस्लिमबहुल वस्तीही जवळच होती. त्यामुळे आई वडील आणि मुले मराठी, गुजराती, तेलुगू आणि उर्दूमिश्रित हिंदी बोलू लागले.

पाचव्या इयत्तेतील स्कॉलरशिपमुळे अकरावीपर्यंत महिना दहा रुपये मिळत असल्याने मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण मोफत झाले. भर तापात परीक्षा देऊनसुद्धा मारुती चितमपल्ली वर्गात पहिल्या नंबराने पास झाले. महाविद्यालयात प्रवेश घेतल्यावर चितमपल्लींनी त्यांची वही मराठीच्या प्राध्यापकांना दाखवली, आणि तिच्यातली एक कथा महाविद्यालयाच्या नियतकालिकात प्रकाशित झाली.

त्यांच्या वडिलांना वाचण्याची आवड तर आईला अरण्यवाटांची. आई, वडील, आत्या, मामा यांच्याबरोबर रानवाटेने चालताचालता मारुती चितमपल्लींना जंगलांबद्दल आकर्षण वाटू लागले. क्षणोक्षणी पडे, उठे, परि बळे उडे बापडी ह्या कवितेतील कारुण्य शाळेत असताना जाणवले, आणि जंगलांतील पक्ष्यांविषयी प्रेम वाटू लागले.

आयुष्यभर हरणाची शिकार करणाऱ्या भीमाचा मृत्यू हरणासारखा तडफडत झाला, ही आईने सांगितलेली गोष्ट आयुष्यभर विसरता येण्यासारखी नव्हती. आईला पशुपक्ष्यांची खूप माहिती होती. चंडोल ऊर्फ माळचिमणी, कोकिळा ऊर्फ कोयाळ, सातबहिणी ऊर्फ बोलांड्या, लावा ऊर्फ भुरगुंज्या अशी कितीतरी नावे चितमपल्लींना आईकडून ऐकायला मिळाली.

हरणाच्या नराला काळवीट आणि लांडग्याच्या मादीला लासी असा नर-मादीतला फरक तिनेच शिकविला. माळढोक हे नाव पहिल्यांदा आईनेच ऐकवले. तिने दिलेले रंगांच्या छटांचे ज्ञान पाखरांच्या आणि फुलपाखरांचे वर्णन करताना मारुती चितमपल्लींच्या उपयोगी पडले.

लिंबामामा हा मारुती चितमपल्लींचा अरण्यविद्येतला दुसरा गुरू. प्राणी, पक्षी, वनस्पती तो न बोलता नजरेने दाखवी. वीण झाल्यानंतर सोडून दिलेली सुगरण पक्षाची घरटी त्यानेच दाखविली. त्याच्याबरोबर रानातून चालताना रुई, धोतरा, निवडुंगाची माजलेली झुडपे आणि बोरी, बाभळी, निंबाची काटेरी झुडपे चुकवत चालावे लागे. त्या झाडाखालून चितमपल्लींनी होल्यांची घरटीही शोधली. फुलपाखरांच्या मागे जात गवतामधील कीटकांचे संगीत ऐकायला ते तिथेच शिकले.

अरण्यवाटेवर आणखी एकाने, (हणमंतामामाने) चितमपल्लींना जंगलाचे न्यारे जग शिकवले, पाखरांची नावे त्यानेच सांगितली. तळ्याकाठी पाखरांची पिसे सापडायची. पारी, पोपटी व उदी रंगाची पिसे पाहून हणमंतामामा पाखरांची नावे सांगायचा. मामा खांद्यावर कुदळ घेऊन उंच वारूळ शोधत चालायचा. या वारुळांना ते टेकराज म्हणत, पण हे वारूळ म्हणजेच सापांचे घर कधी दिसले नाही. हणमंतामामाजवळ सापांविषयी खूप ज्ञान होते. विषारी, बिनविषारी सापांपासून तर सापांच्या जाती ओळखण्यापर्यंत आणि सापांची अंडी असे सारे काही चितमपल्लींना हणमंतामामाकडूनच शिकायला मिळाले.

हणमंतामामांनी चितमपल्लींना वन्यप्राण्यांच्या असंख्य लोककथा सागितल्या, आणि तेच ज्ञान पुढे वनखात्याच्या नोकरीत कामी पडले. मामाची अंधश्रद्धाच चितमपल्लींना पशुपक्ष्यांविषयीच्या संशोधनासाठी कारणीभूत ठरली. काय खरे आणि काय खोटे हे ओळखता येऊ लागले.

मारुती चितमपल्लींचे रानाविषयीचे प्रेम आई, माळकरीण आत्या, लिंबामामा आणि हणमंतमामा यांनी जोपासले. त्यांच्यामुळे त्यांना वन्यजीवशास्त्र उलगडले.

पारंपरिक कॉलेज शिक्षणात अपयशी ठरल्यानंतर मारुती चितमपल्ली यांनी वानिकी महाविद्यालयाची वाट धरली. पुण्यातील विभागीय वनाधिकारी कार्यालयात अर्ज सादर केला. सोलापूरचे राहणारे वनक्षेत्रपाल एम.डी. गाडगीळ यांची पुण्यातील वनसंशोधन केंद्रात भेट घेतली. त्यांनी वनक्षेत्रपालाच्या निवडीसाठी होणारी लेखी परीक्षा, त्याची पूर्वतयारी याविषयी वितमपल्लींना मार्गदर्शन केले.

विद्यापीठ परीक्षेचा निकाल वाईट लागणार होता. तरीही वानिकी महाविद्यालयातील प्रवेशासाठी सर्व परीक्षा गंभीरपणे देण्याचा निर्धार त्यांनी केला. मुलाखतीला कशी उत्तरे द्यायची हे गाडगीळ यांनी सांगितले होते. सोळा मैल चालण्याच्या परीक्षेचा सरावही केला. त्यासाठी आई, मामांसोबत लहानपणी केलेली रानभटकंती उपयोगी ठरली.

एकीकडे विद्यापीठ परीक्षा सुरू असतानाच मुख्य वनसंरक्षकांकडून मुलाखतीकरिता बोलावणे आले. जे. ए. सिंग यांनी त्या वेळी मुलाखत घेतली होती. मुलाखतीत यश मिळाले आणि सोळा मैल चालण्याची परीक्षाही यशस्वीरीत्या पूर्ण केली. त्यामुळे वानिकी महाविद्यालयातील प्रवेशाची निश्चिती मिळाली. अपेक्षित होते तेच झाले आणि वनखात्याकडून अपेक्षित पत्र आले. मारुती चितमपल्लींची कोईमतूरच्या सदर्न फॉरेस्ट रेंजर्स कॉलेज या वानिकी महाविद्यालयात दोन वर्षांच्या प्रशिक्षणासाठी निवड झाली. या वानिकी महाविद्यालयात प्रवेश झाला आणि मारुती चितमपल्ली यांचे आयुष्य एका वेगळ्या वाटेने पुढे जाऊ लागले.

शिस्त काय असते हे त्यांना या महाविद्यालयाने शिकवले. पहाटे उठणे, ठरलेल्या वेळेनुसार सर्व काही करणे सुरू झाले. वानिकी महाविद्यालयात असताना पहिल्यांदा त्यांनी वनातला अभ्यास दौरा केला. जंगलात राहायचे म्हणजे तंबूत, महिनाभर लागणारे सारे सामान सोबत, असे सारे काही कुतूहलमिश्रित होते.

प्रवेश घेताना १६ मैलांची अट जशी कायम होती, तशी मॅरेथॉन रेसमधून महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना १६ मैलांचे अंतर धावत धावत चार तासांत पूर्ण करावे लागे. वनाधिकारी म्हणून तंदुरुस्त आहात की नाही याची ती चाचणी होती. मात्र, पहिल्याच वर्षी मॅरेथान रेसमध्ये धावताना मेंदूतील रक्तस्त्रावामुळे एका सहकाऱ्याचा मृत्यू झाला. भविष्यात वनाधिकाऱ्याला कशा प्रकारच्या संकटांना तोंड द्यावे लागू शकते, याचे दाहक वास्तव मारुती चितमपल्लींनी विद्यार्थिदशेतच अनुभवले.

**वनखात्याची नोकरी**

मारुती चितमपल्लींना वनखात्यातील नोकरीत ज्येष्ठ पक्षितज्ज्ञ डॉ. सलीम अलींचा सहवास खूप काही शिकवून गेला. वनखात्यातील नोकरीच्या निमित्ताने चितमपल्लींनी अनेक ठिकाणचे जंगल पिंजून काढले.

पश्चिम महाराष्ट्रात १५ वर्षे नोकरी केल्यानंतर ते विदर्भात नवेगाव बांधला आले. त्यानंतर नागझिरा, नागपूर, मेळघाट येथली जंगले अनुभवली. मात्र त्यांना नवेगाव बांधचे जंगल अधिक आवडले. शिकारीसाठी येणारे माधवराव पाटील त्यांनी तेथेच भेटले. शिकारीच्या निमित्ताने आपल्या सोबत्यांकडून माधवराव वनविद्या शिकले आणि ही वनविद्या त्यांच्याकडून चितमपल्लींना शिकता आली. मात्र, ही वनविद्या साध्य करायला त्यांना अनेक वर्षे लागली.

**संस्कृतचा अभ्यास**

मारुती चितमपल्ली यांनी परंपरागत पद्धतीने संस्कृत साहित्याचे अध्ययन केले आणि त्यानंतर जर्मन आणि रशियन भाषांचा अभ्यास केला.

रामटेकच्या कालिदास संस्कृत विद्यापीठाच्यावतीने प्राचीन भारतीय साहित्यातील पर्यावरण असा एक प्रमाणपत्र अभ्यासक्रम चालविला जातो. चितमपल्ली यांनी ८४ व्या वर्षी त्या अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला आणि तो अभ्यासक्रम पूर्णही केला.

-------------

(मारूती चितमपल्ली यांच्यावरील सदर लेखाचा उर्वरीत भाग उद्याच्या अंकात)

■ ■ ■

# शिवसेनेचा इतिहास आणि धडा शिकविण्याची गरज!




बॉम्बे प्रोव्हिन्स, मुंबई प्रांत, मुंबई इलाखा, मुंबई द्विभाषिक राज्य असा प्रवास करीत करीत मुंबई सह संयुक्त महाराष्ट्र व्हावा म्हणून १९५६ साली संयुक्त महाराष्ट्र लढा जोरात उभारण्यात आला. त्यानंतर झालेल्या गोळीबारात एकशे सात बहाद्दरांनी हौतात्म्य पत्करले आणि १ मे १९६० रोजी मुंबई सह संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात आला.

मुंबई महाराष्ट्राची राजधानी झाली परंतु बेळगांव, कारवार, निपाणी, भालकी, बिदर सह ८६५ मराठी भाषिक गावे कर्नाटकातच राहिली. मुंबई महाराष्ट्रात आली, राजधानी झाली. परंतु मुंबईत महाराष्ट्र नाही, मुंबईत मराठीला दुय्यम स्थान मिळाले. म्हणून आंतरराष्ट्रीय कीर्तीचे व्यंगचित्रकार बाळासाहेब ठाकरे यांनी १३ ऑगस्ट १९६० रोजी मार्मिक हे जागतिक पातळीवरचे पहिले मराठी व्यंगचित्र साप्ताहिक सुरु केले.

या मधून अमराठी अधिकाऱ्यांची यादी 'वाचा आणि थंड बसा' या शीर्षकाखाली प्रसिद्ध करायला सुरुवात केली. यामुळे मराठी माणसात जागृती निर्माण होऊ लागली.

तीर्थस्वरुप दादा म्हणजे केशव सीताराम उर्फ प्रबोधनकार ठाकरे यांनी बाळासाहेब ठाकरे यांना विचारले की बाळ, पुढे काय करायचं ठरवलंय ? बाळासाहेब म्हणाले, दादा, मराठी तरुणांची संघटना काढायचा विचार आहे. दादा म्हणाले, काढ, संघटना काढ आणि त्या संघटनेला नांव दे 'शिवसेना'. ठरलं.

शिवसेनाप्रमुख श्री बाळासाहेब ठाकरे यांनी १९ जून १९६६ रोजी मराठी माणसाच्या न्याय्य हक्कांसाठी शिवसेना स्थापन केली. ही लढाऊ बाण्याची संघटना आज हीरक महोत्सवाच्या उंबरठ्यावर उभी आहे. अनेक उन्हाळे, पावसाळे या संघटनेने पाहिले असून काटेरी मार्गावरुन यशस्वीपणे वाटचाल सुरु ठेवली आहे. अनेक आले आणि गेले, पण बाळासाहेब ठाकरे यांच्या कडवट शिवसैनिकांच्या जोरावर ही संघटना भरभक्कम पणे भविष्याचा वेध घेण्यासाठी झेपावली आहे.

१९ जून १९६६ पासून शिवसेनेने अनेकांना सोबत घेऊन वाटचाल करतांना परिणामांचा मुलाहिजा बाळगला नाही. यशवंतराव चव्हाण यांनी सनदी अधिकारी स. गो. बर्वे यांना १९६७ साली कॉंग्रेस पक्षात आणून इशान्य मुंबई लोकसभा मतदारसंघात उभे केले. यावेळी बाळासाहेब ठाकरे यांनी कृष्ण मेनन यांच्या विरोधात उभ्या असलेल्या स. गो. बर्वे यांना पाठिंबा दिला.

हे बर्वे कॉंग्रेसचे होते. त्यावेळी 'हटाव लुंगी, बजाव पुंगी' ही घोषणा गाजली होती. दुदैवाने स. गो. बर्वे यांचे निधन झाले आणि मग ताराबाई सप्रे या बर्वे भगिनी कॉंग्रेस तर्फे पोटनिवडणुकीत उभ्या होत्या. बाळासाहेब ठाकरे यांनी त्यांनाही समर्थन दिले होते.

१९६८ साली मुंबई महापालिका निवडणुकीत मधु दंडवते यांच्या प्रजा समाजवादी पक्षाबरोबर बाळासाहेब ठाकरे यांनी युती केली होती. मुस्लिम लीगच्या जी. एम. बनातवाला यांच्या बरोबरही बाळासाहेब ठाकरे यांनी युती केली होती. वरळीला आदित्य ठाकरे यांना आव्हान देणारे मिलिंद देवरा यांचे तीर्थरूप मुरलीभाई देवरा यांना मुंबईच्या महापौरपदी बाळासाहेब ठाकरे यांनी बसविले.

या मुरलीभाईंनी तब्बल २२ वर्षे मुंबई विभागीय कॉंग्रेसचे अध्यक्षपद भूषविले होते. पहिल्या महिला मराठी राष्ट्रपती म्हणून प्रतिभाताई देविसिंह शेखावत पाटील यांना बाळासाहेब ठाकरे यांनी भरभक्कम पणे पाठिंबा दिला होता. या बद्दल शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे आभार मानण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख आणि उपमुख्यमंत्री रावसाहेब रामराव (आर आर) पाटील हे दोघे मातोश्रीवर आले होते.

कॉंग्रेसचे चाणक्य समजण्यात येणारे प्रणव कुमार मुखर्जी यांना पाठिंबा देऊन बाळासाहेब ठाकरे यांनी त्यांना राष्ट्रपती पदी निवडून येण्यासाठी बहुमोल योगदान दिले. शरद पवार, जॉर्ज फर्नांडिस आणि बाळासाहेब ठाकरे यांचे शिवतीर्थावर दसरा मेळाव्यात झालेले मार्गदर्शन अजूनही लोक विसरलेले नाहीत.

१३ ऑगस्ट १९६० रोजी मार्मिक या आंतरराष्ट्रीय पातळीवरील पहिल्या मराठी व्यंगचित्र साप्ताहिक चे प्रकाशन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या शुभहस्ते झाले होते. ३० ऑक्टोबर १९६६ रोजी शिवतीर्थावर पहिल्या दसरा मेळाव्यात बॅरिस्टर रामराव आदिक व्यासपीठावर उपस्थित होते. १९८७ साली विलेपार्ले येथील पोटनिवडणुकीत बाळासाहेब ठाकरे यांनी सर्वप्रथम हिंदुत्वाचा मुद्दा घेत डॉ. रमेश प्रभू यांना उभे केले.

त्या विधानसभा पोटनिवडणुकीत भारतीय जनता पक्षाने जनता दलाच्या प्राणलाल व्होरा यांना पाठिंबा दिला होता तर शिवसेनेने हिंदुत्वाचा मुद्दा घेतला असल्याने बजरंग दल आणि विश्व हिंदू परिषद यांनी शिवसेनेच्या डॉ. रमेश प्रभू यांना समर्थन दिले होते. या हिंदुत्वासाठी बाळासाहेब ठाकरे यांचा मतदानाचा अधिकार सहा वर्षे हिरावून घेतला होता तर रमेश प्रभू यांची आमदारकी रद्दबातल ठरवली होती.

जेंव्हा शिवसेना हिंदुत्वाच्या मुद्द्यावर विलेपार्ले पोटनिवडणुकीत विजयी झाली तेंव्हा भारतीय जनता पक्षाचे चाणक्य प्रमोद व्यंकटेश महाजन यांनी शिवसेनेबरोबर युती करण्यासाठी बाळासाहेब ठाकरे यांना साकडे घातले. १९८९ लोकसभा आणि १९९० विधानसभा निवडणुकीत शिवसेना भारतीय जनता पक्ष युती म्हणून दोन्ही पक्ष एकत्र लढले.

१९९० च्या विधानसभा निवडणुकीत मुंबई मधून निवडून आलेल्या शिवसेना भाजप युतीच्या आमदारांविरोधात कॉंग्रेस पक्षाच्या पराभूत उमेदवारांनी मनुभाई वशी आणि मुकेशभाई वशी यांच्या माध्यमातून मुंबई उच्च न्यायालयात निवडणूक याचिका दाखल केल्या.

या निवडणुकीत गिरगांव चौपाटीवर झालेल्या विराट प्रचार सभेत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी, महाराष्ट्रात राहतो तो मराठी, गुजरातमध्ये राहतो तो गुजराथी, बंगालमध्ये राहतो तो बंगाली या न्यायाने हिंदुस्थानात राहतो तो हिंदू, आमचे हिंदुत्व हे शेंडी जानव्याचे नाही तर आमचे हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व आहे,अशी हिंदुत्वाची व्याख्या ठणकावून सांगितली होती.

गिरगांव चौपाटीवर झालेल्या सभेचे वृत्तांकन दैनिक सामना साठी मी केले होते म्हणून मला वशी यांनी मुंबई उच्च न्यायालयात साक्षीदार म्हणून बोलावले होते. साक्षीदार म्हणून अंबरनाथ येथून मुंबई उच्च न्यायालयात पाच वर्षे चकरा माराव्या लागल्या. बाळासाहेब ठाकरे यांची हिंदुत्वाची व्याख्या मनोहर जोशी यांच्या खटल्यात मनोहर जोशी यांचे वकील जय चिनॉय यांनी माझ्या तोंडून शिताफीने रेकॉर्डवर आणली, एवढेच नव्हे तर ही व्याख्या प्रसिद्ध झालेल्या दैनिक सामनाच्या विविध अंकांचे न्या. सॅम वरियावा यांच्या न्यायालयात सादरीकरण केले.



**योगेश वसंत त्रिवेदी**
**मुंबई.**
**९८९२९३५३२१.**
**(लेखक ज्येष्ठ राजकीय विश्लेषक आहेत)**

याच आधारावर सर्वोच्च न्यायालयात ११ डिसेंबर १९९५ रोजी न्या. जे. एस. वर्मा यांनी मनोहर जोशी यांना हिंदुत्वाच्या खटल्यातून निर्दोष मुक्त केले. ६ डिसेंबर १९९२ रोजी अयोध्येत बाबरी मशीद धराशायी झाल्यावर पत्रकारांनी भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष सुंदरसिंह भंडारी यांना, बाबरी किसने गिरायी?, असे विचारताच त्यांनी काखा वर करीत, नहीं वे बीजेपी के नहीं थे, आरेसेस के नहीं थे, बजरंग दल के नहीं थे, व्हिएचपी के नहीं थे, असे उत्तर दिले. पुन्हा पत्रकारांनी त्यांना विचारता ते म्हणाले, शायद वे शिवसेना के होंगे.

याच वेळी वांद्रे येथून शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी एकच डरकाळी फोडली की, जर माझ्या शिवसैनिकांनी बाबरी उद्ध्वस्त केली असेल तर मला त्यांचा अभिमान आहे.

यावर शिवसेनेचे ठाणे जिल्हाप्रमुख धर्मवीर आनंद दिघे यांनी बाबरी मशीद धराशायी होतांनाची छायाचित्रे असलेली दिनदर्शिका प्रकाशित केली आणि गर्व से कहो हम हिंदू हैं असे ठळकपणे छापले. त्यावर बंदी घालण्यात आली.

यानंतर मुंबई महाराष्ट्रात दंगल पेटली. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि शिवसेनेने तमाम हिंदू आणि मराठी बांधवांना वाचवण्यासाठी ढाल म्हणून संरक्षण दिले. या शिवसेनारुपी रक्षा कवचामुळे प्रभावित होऊन गुजराती बांधवांनी गिरगांव चौपाटी जवळ सभागृहात बाळासाहेब ठाकरे यांना सन्मानित केले आणि हिंदुहृदयसम्राट असे संबोधून गौरव केला. तेंव्हापासून बाळासाहेब ठाकरे यांचे नाव हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे असे रुढ झाले.

५ डिसेंबर १९९१ रोजी छगन भुजबळ १५ आमदारांना घेऊन बाहेर पडले. त्यानंतर गणेश नाईक, नारायण राणे, राज ठाकरे बाहेर पडले. परंतु उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना एकट्या हाताने निवडणूक लढवून आपले अस्तित्व दाखवून देती जाहली.

१७ नोव्हेंबर २०१२ रोजी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या महानिर्वाणानंतर २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने एकहाती ६३ जागा जिंकल्या.

शरद पवारांच्या अदृश्य हाताने देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील भारतीय जनता पक्षाचे अल्पमतातील सरकार वाचविले. पण २२ वर्षे जेवढी बदनामी सहन करावी लागली नाही तेवढी बदनामी २२ दिवसात सहन करावी लागली, असे सांगत देवेंद्र फडणवीस यांनी आपले सरकार पाच वर्षे टिकविण्यासाठी धर्मेंद्र प्रधान आणि चंद्रकांत पाटील यांना मातोश्रीवर पाठवून उद्धव ठाकरे यांच्या पाठिंब्यासाठी साकडे घातले.

उद्धव ठाकरेंनी मोठ्या मनाने देवेंद्र फडणवीस याना पाठिंबा दिला. ५ डिसेंबर २०१४ रोजी सकाळी विरोधीपक्षनेते असलेले एकनाथ संभाजी शिंदे उद्धव ठाकरे यांच्या समर्थनामुळे सायंकाळी मंत्री झाले. २०१९ पर्यंत उद्धव ठाकरे यांच्या पाठिंब्यावर देवेंद्रांचे सरकार टिकले.

१८ फेब्रुवारी २०१९ रोजी अमित शाह मुंबईत आले आणि सॉफिटेल या पंचतारांकित हॉटेलमध्ये उद्धव ठाकरे यांच्या समवेत बंद दाराआड चर्चा केली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दरवाजाबाहेर बसले होते. ते चर्चेत सहभागी झाले नव्हते.

सॉफिटेल, मातोश्री वरील चचेअंती वरळीच्या ब्ल्यू सी हॉटेल मध्ये देवेंद्र फडणवीस यांनी अमित शाह आणि उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या सर्व मागण्या मान्य केल्याची जाहिरात केली.

लोकसभा निवडणूक पार पडली. विधानसभा निवडणुकीत युती म्हणून लढल्यानंतर पन्नास पन्नास टक्के सत्तेच्या जबाबदारी देण्या घेण्याचा करार भारतीय जनता पक्षाने मानला नाही. अखेर शिवसेना, कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस या तीन पक्षांनी महाविकास आघाडी बनविली.

ही महाविकास आघाडी होऊ शकते असे सर्वात आधी भाकित करणारे आज एकनाथ शिंदे यांचे प्रवक्ते बनलेत. दरम्यान २३ नोव्हेंबर २०१९ रोजी सक्काळीच देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री असा शपथविधी उरकून घेतला. परंतु ८० तासातच अजितदादांनी घूमजाव केले. सर्वात कमी ८० तासांच्या मुख्यमंत्री पदाचा विक्रम देवेंद्र फडणवीस यांच्या नांवे नोंदला गेला.

२८ नोव्हेंबर २०१९ रोजी उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी महाविकास आघाडी सरकारचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. एकनाथ शिंदे यांनी नगरविकास मंत्री म्हणून शपथ घेतली. याच काळात कोरोनाची खतरनाक महामारी फैलावली. स्वतः उद्धव ठाकरे गंभीर आजारातून बाहेर पडले. या काळात उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री म्हणून उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल एक नव्हे दोन नव्हे तर चार चार वेळा राष्ट्रीय पातळीवर वाखाणणी होत होती.

अजित पवार यांना उद्धव ठाकरे यांनी माझे, शिवसेनेचे जे काही असेल ते एकनाथ शिंदे आपणांस सांगतील, असे सांगितले होते. त्याचा पुरेपूर फायदा एकनाथ शिंदे यांनी उचलला. अडीच वर्षे सत्ता उपभोगूनही एकनाथ शिंदे आणि त्यांच्या साथीदारांनी अजित पवार हे निधी उपलब्ध करून देत नाहीत, अशा तक्रारींचा लकडा लावला.

जून २०२२ मध्ये शिवसेना फोडून बाहेर पडले. सुरत, गुवाहाटी, गोवा करीत अमित शाह, देवेंद्र फडणवीस यांच्या साथीने उद्धव ठाकरे यांचे सरकार उलथवीत भारतीय जनता पार्टी बरोबर सरकार बनविले. मुख्यमंत्री असलेल्या देवेंद्र फडणवीस यांच्या पदरी उपमुख्यमंत्री पद आले. त्यांना सरकार बाहेर राहून सरकारवर नियंत्रण ठेवायचे होते. परंतु पक्षश्रेष्ठींनी त्यांचा मनसुबा उधळवून लावला.

----------

(या लेखाचा उर्वरीत भाग उद्याच्या अंकात प्रकाशित केला जाईल.)

■ ■ ■

# बाळ आणि आईचे प्राण वाचविण्यास रक्तदान!

**(१४ ते २० जून : जागतिक रक्तदाता दिवस सप्ताह)**

रक्तदान केल्याने आपल्या शरीरावर कोणताही दुष्परिणाम होत नाही. जे लोक ऐच्छिक रक्तदान करून जीवनदान करतात, त्यांचे आभार मानणे व नवीन लोकांना रक्तदानास प्रवृत्त करणे, असे जागतिक रक्तदाता दिवसाचे प्रमुख उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. दरवर्षी १४ जून रोजी संपूर्ण जगातील रक्तदात्यांचा सन्मान दिवस म्हणून जागतिक स्तरावर साजरा केला जातो. रक्त संक्रमणासाठी सुरक्षित रक्त व रक्त उत्पादनांची आवश्यकता, राष्ट्रीय आरोग्य यंत्रणेत स्वयंसेवी आणि विनाअनुदानित रक्तदात्यांनी दिलेल्या महत्त्वपूर्ण योगदानाविषयी जागतिक जागरूकता वाढविणे, हाही यामागील हेतू आहे. हा दिवस सरकार आणि राष्ट्रीय आरोग्य अधिकाऱ्यांना आवश्यक संसाधने उपलब्ध करुन देण्यासाठी, स्वेच्छा, मोबदला न मिळालेल्या रक्तदात्यांकडून रक्त संग्रह वाढविण्यासाठी तसेच यंत्रणा व पायाभूत सुविधा तयार करण्यासाठी कृती करण्याची संधी प्रदान करतो.

-----------------

शास्त्राप्रमाणे जीवनदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. सामान्य व्यक्तीही रक्तदान करून दुसऱ्याचा जीव वाचवू शकते. रक्तदात्यांचे आभार व्यक्त करण्यासाठी सन २००४ पासून जागतिक आरोग्य संघटना १४ जून रोजी जागतिक रक्तदाता दिवस साजरा करते. आजदेखील समाजात रक्तदान करणाऱ्यांची संख्या कमी आहे. त्यामुळे रक्तदात्याला रक्तदानास प्रेरित करण्याच्या अनुषंगाने व नियमित रक्तदात्यांचे आभार व्यक्त करण्यासाठी २००४ पासून जागतिक आरोग्य संघटना हा दिवस साजरा करत असते.

ए-बी-ओ या रक्तगटांचा शोध लावणारे आणि रक्तदान संकल्पनेला अधिक शास्त्रशुद्ध पद्धतीने मांडणारे ऑस्ट्रियाचे शरीरविज्ञानात नोबेल पारितोषिक प्राप्त डॉ. कार्ल लॅन्डस्टेनर यांच्या जन्मदिनानिमित्त हा दिवस जागतिकस्तरावर साजरा केला जातो. डॉ.कार्ल लॅन्डस्टेनर यांचा जन्म दि.१४ जून १८६८ रोजी ऑस्ट्रियात झाला. त्यांचीच आज जयंती जागतिक रक्तदाता दिन म्हणून पाळण्यात येत आहे. हा दिवस सर्वप्रथम सुरू करण्याकरीता दि.१४ जून २००४ रोजी जागतिक आरोग्य संघटना, रेडक्रॉस आणि आंतरराष्ट्रीय रेड क्रॉसेंट सोसायटी ऑफ इंटरनेशनल फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने प्रयत्न करण्यात आले होते.

स्वेच्छेने व मोबदला न घेता सुरक्षित रक्तदान करण्याच्या गरजेबद्दल जनजागृती व्हावी, या उद्देशाने साजरा करण्यात आला. मे २००५मध्ये डब्ल्यूएचओने एका जागतिक आरोग्य असेंब्लीच्या जागतिक रक्तदाता दिनानिमित्त १९२ सदस्य देशांसह अधिकृतपणे समितीची स्थापना केली. जेणेकरुन जगातील सर्व देशांना रक्तदात्यांच्या बहुमोल कृतीबद्दल आभार मानण्यास आणि लोकांचे जीवन वाचवण्यास प्रवृत्त केले जाईल. हा दिवस साजरा करण्याची उद्दिष्टे लोकांना रक्तदानासाठी प्रोत्साहित करणे आणि त्याच्याशी संबंधित गैरसमज दूर करणे आहे.

अपघातात झालेला अतिरिक्त रक्तस्त्राव, पॅलेसोमिया, रक्तक्षय, रक्ताचा कर्करोग, प्रसूतिपश्चात रक्तस्त्राव, शस्त्रक्रिया आणि इतर गंभीर आजारांमधे योग्यवेळी रुग्णाला रक्त मिळाले नाही तर तो रुग्ण दगावण्याची शक्यता असते. अशावेळी एका मानवाचेच रक्त दुसऱ्या मानवाचे प्राण वाचवू शकते. कारण मानवाचे रक्त कोणत्याही कारखान्यात तयार होत नाही व दुसऱ्या कोणत्याही प्राण्याचे रक्त मानवासाठी उपयोगात येऊ शकत नाही. त्यामुळे रक्तदानाला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

महाराष्ट्र राज्यात रुग्णांसाठी दरवर्षी सुमारे साडेसात लाख बाटल्या रक्त लागते. ही गरज ७० ते ७५ टक्के पर्यायी बदली रक्तदाता किंवा व्यावसायिक रक्तदात्याकडून भागविली जाते. मानवाच्या शरीरामध्ये साडेचार ते पाच लिटर रक्त असते. रक्तदानाच्या वेळी केवळ ३०० मिली रक्त काढले जाते.

प्रत्येक रक्तदानानंतर साधारण ३६ तासांमध्ये शरीरात रक्ताची पातळी पूर्ववत होते. तसेच साधारण २ ते ३ आठवड्यांत रक्तपेशीही पूर्ववत होतात. रक्तदान केल्याने कोणताही त्रास किंवा इजा होत नाही. ब्लड बँकेच्या रेफ्रिजरेटरमध्ये फक्त ४-५ आठवड्यांपर्यंत रक्त सुरक्षित ठेवता येते. रक्तदानामुळे प्रत्येक वर्षी अनेकांना जीवनदान मिळते.

अनेक मोठ्या सर्जरींमध्ये किंवा गंभीर परिस्थितीत रक्तदानामुळे रुग्णाचे प्राण वाचण्यास मदत होते. तसेच गरोदरपणात बाळाचे आणि आईचे प्राण वाचविण्यास रक्तदान महत्त्वाचे कार्य करते. आपल्या भारत देशात १२० कोटी लोकसंख्या असूनही केवळ ७४ लाख ते १ कोटी २० लाख लिटर रक्त संकलित होते. रक्त न मिळण्यामुळे मृत्यूचे प्रमाण देशभरात १५ ते २० टक्के आहे. भारतात केवळ ०.६ टक्के लोक रक्तदान करतात.

रक्तदान हे एखाद्या व्यक्तीने स्वेच्छेने अंगातून रक्त काढून देण्याची क्रिया आहे. असे रक्त रुग्णाच्या शरीरात चढवण्यापूर्वी बायोफार्मास्युटिकल प्रक्रियेद्वारे त्याचे विभाजन केले जाते व संपूर्ण रक्त किंवा रक्ताचा आवश्यक तोच घटक त्याच्या शरीरात इंजेक्ट केला जातो. रक्त संकलन प्रक्रियेत ब्लड बँक- रक्त बँकांचा सहभाग असतो.

बहुतेक रक्तदाते- स्वयंसेवक स्वखुशीने अणि विनामोबदला रक्तदान करतात. काही देशांमध्ये रक्ताचा पुरवठा मर्यादित आहे. कारण देणगीदार फक्त नातेवाईकांसाठी किंवा मित्रांसाठीच रक्त दान करतात. अनेक रक्तदाते रक्तदान एक देणगी म्हणून करतात. परंतु ज्या देशांमध्ये रक्त विकण्याची परवानगी आहे, तिथे रक्तदात्यांना पैसे मिळतात. रक्तदानासाठी काही ठिकाणी कामकाजावरून मोकळा वेळ दिला जातो.

वयाच्या १८ वर्षानंतर ते ६५ वर्षापर्यंत, वजन ४५ किग्रॅच्या वर असल्यास, रक्तातील हिमोग्लोबिनचे प्रमाण कमीत कमी १२.५ ग्रॅम असल्यास, रक्तदाता पूर्णपणे निरोगी असल्यास, अशा निरोगी माणसाला दर ३ महिन्यांनी जवळच्या रक्तपेढीत किंवा कोठेही आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात रक्तदान करता येते. तर रक्तदात्याने आधीच्या ३ दिवसांत कोणतेही प्रतिजैविक औषध घेतलेले असल्यास, रक्तदात्याला मागील ३ महिन्यात मलेरिया झाला असल्यास, रक्तदात्याला मागील १ वर्षात विषमज्वर, कावीळ किंवा श्वानदंश होऊन त्याने रेबीजची लस घेतली असल्यास, त्याची ६ महिन्यापूर्वी मोठी शस्त्रक्रिया झाली असल्यास, गर्भवती महिला, महिलेला १ वषार्खालील मूल असल्यास किंवा तिचा ६ महिन्यात गर्भपात झाला असल्यास अशांना रक्तदान करता येत नाही. ब्लड प्रेशर लो किवा हाय असणाऱ्यांनी रक्तदान करताना रक्तदाबाची चाचणी करून पहावी, उपाशी पोटी किवा खाऊन झाल्यावर अर्ध्या तासापर्यंत रक्तदान करू नये. तसेच रक्तदानास इच्छुक असणारास इतरही आजारांची चाचणी करून घ्यावी लागते.

सद्या तर आपल्या देशात वर्षभरच रक्तदान शिबीरे आयोजित करून भरपूर रक्तसंकलन केले जात आहे. सामाजिक, धार्मिक, आध्यात्मिक, सेवाभावी संस्था रक्तदान शिबीरांच्या माध्यमातून संकलीत रक्तसाठा रक्तपेढ्यांकडे सुपूर्द करीत असतात. गरजूंना रक्त वेळेत मिळत नाही. प्रसंगी आर्थिक टंचाईच्या कारणाने गरीबांना प्राणानिशी मुकावे लागत आहे.

मग एवढा संकलीत रक्तसाठा जातो तरी कुठे? रक्ताचा काळा बाजार होत नाही ना? हा संशोधनाचा विषय होऊन बसला आहे. नेहमीच आरोग्य विभागाची बोंब ऐकू येते, की रक्तपेढीत रक्तच उपलब्ध नाही. याकडे आज निक्षून लक्ष घालण्याची गरज असल्याची ओरड गरीब व सर्वसामान्य जनतेतून होणे साहजिकच आहे.



**कृष्णकुमार आनंदी गोविंदा निकोडे**
**गडचिरोली.**
**९४२३७१४८८३**

■ ■ ■

